प्रकरण चौथे

# कुंजविहारींच्या कवितेचे अभिव्यक्ती सौंदर्य



SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

# प्रकरण ४ थे
# कुंजविहारींच्या कवितेचे अभिव्यक्ती सौंदर्य

प्रस्तावना

१) काव्य प्रकार

२) काव्यातील रस

अ) भक्तिरस

१) स्वातंत्र्यभक्ती

२) राष्ट्रभक्ती

ब) वीररस

क) वत्सलरस

ड) करूणरस

इ) शांतरस

३) गेयता व नादमाधुर्य

४) शब्दकळा

अ) साधी, सोपी, ओघवती भाषा

ब) भावानुरूप भाषा

क) संस्कृत व उर्दू शब्दप्रयोग

ड) संबोधनात्मक व आव्हांनात्मक शब्दप्रयोग

इ) कुंजविहारीची भाषाशैली

५) अलंकार सौंदर्य

१) यमक २) उपमा ३) दृष्टांत ४) रूपक

६) चित्रमय शैली

७) प्रतिके

८) प्रतिमा

९) आशय बदलला की अभिव्यक्ती बदलते

समारोप

संदर्भसूची

**प्रस्तावना**

कुंजविहारींच्या काव्यलेखनाचे स्वातंत्र्यपूर्वक व स्वातंत्र्योत्तर काळ असे दोन प्रमुख कालखंड पडतात. पहिल्या काळात त्यांनी राष्ट्रीय कविता लिहिल्या त्यादृष्टीने स्वातंत्र्यशाहीर म्हटले पाहिजे. या काळातल्या अनेक कविता प्रासंगिक असणे अपरिहार्य होते. कारण स्वातंत्र्य शाहीरांचे प्रमुख कार्य दवंडीवाल्यासारखे असते. त्यामुळे कर्मयोगी रामभाऊ राजवाडे थट्टेने 'कुंजविहारी आमचा राष्ट्रीय दवंडीवाला आहे' असे म्हणत.[१] राष्ट्रीय कविता अनेकदा तत्कालीन व्यक्तीवर व प्रसंगावर आधारित असते. तो काळ गेला की, सर्वाचे महत्त्व नष्ट होते. कवींना या गोष्टीची जाणीव आहे. ३१-७-१९५६ च्या सोलापूर समाचारातील एका लेखात ते म्हणतात, ''राष्ट्रीय कविता केवळ वाड्.मयात उरावे' म्हणून जन्माला आली नव्हती. ती तत्कालीन जनमनात नुरावी म्हणून जन्माला आली होती आता तिचे सार्थक झाले.[२] असे म्हटले असले तरी त्यांच्या काव्यात वाड्.मयीन मूल्ये आढळतात. साहित्य सौंदर्याने कुंजविहारींचे काव्य वरच्या दर्जाचे ठरले आहे.

कुंजविहारींच्या काव्यसंग्रहात काव्याचे विविध प्रकार पाहवयास मिळतात. पोवाडा, आरती, स्वागतगीत, भूपाळी, गोंधळ, भजन, अभंग, वचने, प्रार्थना, पौराणिक कथागीत, पाळणा, लावणी, शेतकऱ्यांचे गाणे, सहकार गीत, ओव्या, दिंडी अनुष्टुभ स्तवन आदी प्रकार हाताळले आहेत.

त्यांच्या काव्यात अनेक रसाचा परिपोष झाला आहे. भक्तिरस यामध्ये स्वातंत्र्यभक्ती, राष्ट्रभक्ती आहे, वीररस आहे, वत्सलरस, करूणरस व शांतरसही कुंजविहारीच्या काव्यात आहे. कुंजविहारीनी काही कवितेंना चालीही लावल्या आहेत. अशा अनेक कवितेत गेयता असल्याने त्यांच्यात नादमाधुर्य आले आहे. कुंजविहारींची भाषा सरळ, साधी, सोपी व भावपूर्ण आहे. भाषेत संस्कृत उर्दू शब्दही आहेत.

संबोधनात्मक व आव्हानात्मक भाषा आहे. कुंजविहारींची एक खास शैली आहे. काव्यात विविध अलंकारही येतात. रूपक प्रतिमांच्या व प्रतीकांच्या भाषेत याची शब्दकला अवतरते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अभिव्यक्तीत बदल झाल्याचे जाणवते. भाषिक दृष्ट्या, भावनिक दृष्ट्या, भाव व भाषा सौंदर्याने कुंजविहारीचे काव्य सरस उतरले आहे.

एवढे लक्षात ठेवायचे की, या सौंदर्यापेक्षा त्यांच्या काव्याने वाचक, श्रोत्यांच्या मनावर परिणाम किती केला. जे काव्य परिणामकारक त्याची यशस्वीता व्यापक असते. असे असेल तर या बाबतीत कुंजविहारींचे पारडे जड आहे.

**१) काव्यप्रकार -**

कुंजविहारींनी काव्यसंग्रह 'गीतगुंजारव' व 'आहुती' मध्ये अनेक काव्यप्रकार हाताळले आहेत. लोकांना परिचित असलेल्या काव्यप्रकाराचा माध्यम म्हणून वापर केला आहे. कुंजविहारींना त्यांच्या राष्ट्राच्या हिताच्या भावना लोकांपर्यंत पोहचवायच्या होत्या. कुंजविहारी कविता लिहून ती जनसमुदायासमोर वाचून गाऊन दाखवत. कवीचा वावर सर्व स्तरातील लोकांच्यात होता. वेगवेगळे काव्यप्रकार हातळण्यावरून कवीच्या बहुश्रुतपणाचा परिचय येतो. कुंजविहारींनी हाताळलेले विविध काव्यप्रकार खालीलप्रमाणे -

**१) स्वागतगीते -**

'गीतगुंजारव' काव्यसंग्रहातील पहिलीच कविता 'सुस्वागतम' आहे. या स्वागतगीतातून ईश्वराचे स्वागत केले आहे.

"स्वागत तव केवि करू भुवन सुंदरा
आलासी अवचित घरि जाई निरंतरा ।" गीत पृ.१

'मुजरा' या कवितेमध्येही माधवाला मुजरा केला आहे. मानवता, शांती, स्वातंत्र्याचे

स्वागत केले आहे.

"मानवतेच्या जित्या ज्योतिना आमंत्रण येथे

ध्वज शांतीमय जगत्क्रांतिचा उभवू लवलाही

भारतियां स्वातंत्र्यरणांगणि दाखवि पथ बरवा

शुभाशुभाच्या सदय विधात्या, स्वीकारी मुजरा." आ.पृ.४८

'स्वागत सुमनांजली' या काव्यात वाङ्.मय सोहळा साजरा करावयाचा आहे. त्यानिमित्ताने हे स्वागतगीत लिहिले आहे.

"सुजन मानधन रसिक सभा ही प्रेमे म्या पूजिली

वाहुनी स्वागत-सुमनांजली ।" आ.पृ.५१

१) आरती -

आरती हा काव्यप्रकार सर्वांना परिचित आहे. इथेही लोकांपर्यंत पोहचण्यासाठी कुंजविहारी आरती या काव्य प्रकारात लिहित आहेत. लोकशाहीचा महिमा वर्णन्यासाठी आरती हे माध्यम स्वीकारले आहे. 'नोकरशाहीची आरती' करताना कवी म्हणतात ,

"जय देवी जय देवी, जय नोकरशाही

अगाध महिमा तूझा वर्णावा काई? जय देवी ।" आ.पृ.९

सद्यस्थितीतील वर्गावर बोट ठेवण्यासाठीही कुंजविहारींनी आरती हेच माध्यम स्वीकारले आहे.

'जय जय म्युनिसिपालिटी, जय कचरापेटी

नगर भवानी अंबे तव किर्ती मोठी । जय देवी जय देवी" आ.पृ.१८

ज्ञानेश्वरीचे महत्व अगाध आहे. ते पटविण्याची गरज होती. ज्ञानेश्वरीचा महिमा

सांगण्यासाठी आरती या काव्यप्रकाराचा अवलंब कुंजविहारींनी केला.

"जय ज्ञानेश्वरि माते ज्ञानामृत-सरिते

प्राकृत-वेष-धारिणी श्री भगवद्गीते । जय देवि जय देवि" गीत पृ.१३

कुंजविहारींचे अराध्यदैवत शिवाजी महाराज. त्यांच्या विषयीची आरती पुढील शब्दात,

जय जय श्री शिवराया अवतारी वीरा

भारतभाग्य-विधात्या स्वीकारी मुजरा । जय हरहर महादेव' गीत पृ.७६

'मंगलारती' या काव्यात भारतमाता स्वतंत्रतेची आरती गाते आहे.

"तू चिरंजीव तव चिरंजीव गुण गाथा

तुज मंगलारती गाते भारतमाता." आ.पृ.८४

**३) स्तवन -**

'शारदास्तवन'या काव्यात कुंजविहारींना शारदेची स्तुती करून स्वातंत्र्याचा आशीर्वाद द्यावयास सांगितला आहे.

"विश्वाची आराध्य देवता । ज्ञानदायिनी माता ।

परमात्म्याची प्रसन्नता । जी सौंदर्याची खाण ।"

"भूषवि जी संसार सुरंगा । सौभाग्याची गंगा

भाव कोमला स्फूर्ति अभंगा । ज्योर्तिमयी भवानी

नमनाचे नजराणे घ्याया । आशीर्वाद दयावा ।" आ.पृ.४७

**४) भूपाळी -**

'श्री ज्ञानेश्वर' काव्यातून ज्ञानेश्वराचे गुणदर्शन घडविले आहे. सकाळच्या रम्य प्रहरी विष्णूचा अवतार असलेल्या ज्ञानेश्वराचे चरित्र श्रवण करावे. हा भूपाळी

लिहण्यामागचा उद्देश आहे.

"संत सज्जना विश्वभूषणा वंदन करि मन्मना
चरित्र-श्रवणे पवित्र सखया होईल तव भावना ।" गीत पृ.१२

**५) गोंधळगीत -**

हिंदवी स्वराज्य स्थापण्यासाठी भवानीने शिवरायांना मदत केली. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी कवी भवानीला गोंधळगीतातून बोलावत आहेत. इतर देवांना, वीरांनाही गोंधळाचे आमंत्रण आहे.

"स्वतंत्रते भगवती उदो गे भारतभू माये
शिवभवानी विभवशालिनी गोंधळास ये ये" आ.पृ.७

**६) पोवाडा -**

राष्ट्रीय कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रीयत्वाचे स्फूरण निर्माण करणे. हे साध्य होते ते पोवाडा या काव्यप्रकारातूनत. कुंजविहारींनी म्हणूनच या काव्यप्रकाराचा समावेश काव्यसंग्रहामध्ये केला आहे. 'तानाजी मालुसरे' यांचा पोवाडा 'मराठा गडी यशाचा धनी' तसेच 'बाल टिळक' यांचा पोवाडा 'सुदिन' या पोवाड्यात शिवाजी महाराजांचे चरित्र वर्णिलेले आहे. असे पोवाडे लिहून कवीने लोकांना गतवैभवाचे स्मरण दिले आहे.

**७) भजन -**

भजन हा काव्यप्रकार कुंजविहारींनी हाताळला आहे. राम भजन याच्या चालीवर 'हुरडा' व 'चिमणा शूर शिपाई' हे भजन कुंजविहारींनी लिहिले आहे. शेतकऱ्यांचे

दु:ख 'हुरडा' या भजनामध्ये सहजतेने लिहिले आहे. तर लहान मुलाचे भवितव्य 'चिमणा शूर शिपाई' मध्ये चित्रित केले आहे.

**८) प्रार्थना -**

'अर्जी' मध्ये कुंजविहारींनी उर्दू मधून ईश्वराला प्रार्थना केली आहे. पारतंत्र्यातील समाज व राजकीय स्थितीचे वर्णन केले आहे. परवशता नष्ट व्हावी हीच या प्रार्थनेमागची भूमिका आहे. कवी म्हणतात -

"हम नवजवानोंका साया है तू । स्वातंत्र्यका शोक लगाया है तू
वादा रख रहम दिल हमारे उपर । "बिहारी" की अर्जी ए मंजूर कर ।"

आ.पृ.११८

'नमो मायभूमी' या कवितेत मातृभूमीला नमस्कार केला आहे.

"गुलाबी छटा पूर्वभागी विराजे । निशानाथ हा भासतो हीन तेजे
तशा तारका लोपल्या सर्व व्योमीं । तुला सुप्रभाती नमूं मायभूमी."

आ.पृ.४

**९) पौराणिक कथागीत -**

पौराणिक कथेला पारतंत्र्यातील स्थितीचा साज चढवून त्या कथेला एक नवीन अर्थ दिला आहे. त्यामुळे त्या कथेला नवीन संदर्भ मिळून अधिक आकर्षक झाली आहे. 'श्री सत्यविनायक' या कवितेतही पौराणिक कथेला पारतंत्र्यातील स्थितीबरोबर समांतर नेले आहे. म्हणूनच ती लोकांपर्यंत पोहचते. 'सावित्रीगीत' या पौराणिक कथेतून सद्यस्थितीचे वर्णन केले आहे. पतिनिष्ठ असलेल्या सावित्रीची ही कथा आहे. तिला कुंजविहारींनी मोजक्या शब्दात, गीतात शब्दबध्द केले आहे.

**१०) वचने -**

कुंजविहारींनी वचने अनुवादित केली आहेत. परंतू ती भाषांतरित करण्या पाठीमागे वाचकांना खऱ्या जीवनाचा मार्ग सांगण्यासाठी, ईश्वर भक्त नाते समजावून सांगण्याचा हेतू होता. 'कबीर वचने' मध्ये कवी सांगतात -

"असोनी दिसेना कवि हा अनंत । पापांचे पर्वत आड उभे
पुण्याईचे फळ पाबेन मी जेंव्हा । प्रभु भेटे तेंव्हा याच देही ।" आ.पृ.९७

कहत कबीरा मध्येही संदेश दिले आहेत.

"जगाच्या या बाजारात । असायचा नफा-तोटा
गुण लोपता निर्गुणी । जीवनात लाभ मोठा ।" आ.पृ.१०६

'भावसुमनांजली' या कवितेमध्ये देव व भक्त यांच्यातील नाते स्पष्ट करण्यासाठी वचने लिहली आहेत.

"आलिंगता तुज लागे देहबुध्दी झडावया
माळ भावसुमनांची वाहते मी तुझ्या पाया ।" आ.पृ.११०

**११) पाळणा -**

'मुळशीचा पाळणा' हे प्रासंगिक काव्य असूनही ते पाळणा काव्यप्रकारात विषय व आशयाने एकरूप झाले आहे. त्यामुळे त्या काव्याची खोली व उंची वरच्या दर्जाची ठरली आहे. माता-बालक यांच्यातील मातृभावाला गरिबीमुळे पारखे व्हावे लागले. आनंदाच्या भावनेची जागा करूणेने घेतल्यामुळे ती लोकांच्या हृदयापर्यंत पोहचते व योग्य परिणाम साधते.

"स्तन बाळाच्या मुखात देते माता । पान्हा जरि फुटला नव्हता
किती वेळ तरी मुखाकडे ती पाही । शेवटचे चुंबन घेई ।" आ.पृ.१४

**१२) शेतकऱ्यांचे गाणे -**

शेतकऱ्यांच्या गाण्यामध्ये शेतकऱ्यांचे दु:ख चित्रित केले आहे. शेतकऱ्यांचे जीवन करूणामय आहे. 'येऊ दे करूणा' या कवितेत ते हुबेहूब चित्रित करण्यात यशस्वी झाले आहेत.

"किडे हो पडले, पडले कणसांत, जाहले बाटुक शेतांत
निघेना दाणा बी-भरणा-पुरता, श्रीहरी सख्या जगन्नाथा ।
आजवर होती ती मेहनत केली, सर्वही मातीमधि गेला
दिवस असतात हे नांगरटीचे, घेतले ऊन उन्हाळ्याचे ।" गीत पृ.३१

**१३) लावणी -**

कुंजविहारींच्या काव्यसंग्रहात लावणी हा काव्यप्रकारही आला आहे. लावणीतून कवीने वीरांगणा चित्रित केली आहे. 'गडे मज संगे घेऊनि चला' या लावणीचा मुखडा शृंगारिक वाटतो. परंतु त्याचा मूळ गाभा वीरश्रीचा आहे. या लावणीतील स्त्री सैनिकाबरोबर खांद्याला-खांदा लावून लढू इच्छिते. कुंजविहारींनी लावणी या काव्यप्रकारालाही राष्ट्रीय काव्याचा उच्च दर्जा प्राप्त करून दिला आहे.

"लढुनि रणांगणि विजय मिळवुनि, सुखविन दोन्ही कुळां
गडे मज संगे घेऊन चला." गीत पृ.४५

'सवाल' हा काव्यप्रकार लावणीतील एक भाग आहे. त्याचाही काव्यसंग्रहामध्ये अवलंब केला आहे. 'सवाल' या कवितेत सत्ताधारी सरकारला आर्यभूमीचा इतिहास सांगून उद्याच्या स्वातंत्र्याची ग्वाही देऊन कुंजविहारी म्हणतात -

"मोल अमोलिक देऊनि भारत स्वराज्य घ्याया अजि सजला
समजुनि-उमजुनि रोख ठोक मनि उत्तर याचे दया मजला" आ.पृ.१६

**१४) ओव्या -**

कुंजविहारींनी संतवाङ्.मयाचा  कवितेतही दिसून येतो. संताच्या आवडत्या ओवीला कुंजविहारींनी आपल्या काव्यसंग्रहात स्थान दिले आहे. 'महात्मा गांधीगीत' ही कविता ओवीमध्ये लिहली आहे.

"स्वदेशीवृत्त घ्यावे तरीच, गांधीगीत गावे
नमस्कार केला पहिला विश्वपालका प्रभूला
रामकृष्ण विठ्ठलाला कुंजविहारी हरीला
आर्यभूमी वंदू आता चरणी वाहिला हा माथा
भाग्यवंत सत्पुत्रांनी कुशी शोभली तत्वनां"          गीत पृ.२२

**१५) अभंग -**

भागवत पंथातील संतांनी लिहिलेले अभंग हे अभंगच राहिले. ती परंपरा कुंजविहारींनीही चालविलेली दिसते. कवीनी 'दावी रूप-डोळा पांडुरंगा' हा अभंग रचला आहे. अभंगाच्या सुरूवातीलाच कवी म्हणतात. "संताच्या प्रदेशात परवानगीवाचून प्रवेश केला असला तरी जपून पाऊल टाकण्याची खबरदारी घेतली आहे." या अभंगातील पुढील ओळी पहा.

"येऊ दे दयाला, दीनाला कळवळा,
दावि रूप डोळा, पांडूरंगा ।
आयुष्याचे कोडे, सोडवील कोण,
सांग तुझ्यावीण पांडुरंगा
कोण मी कोठील, जन्मलो कासया,
जाणे, कोण्या ठाया, पांडूरंगा ।"          गीत पृ.१८

**१६) स्वयंसेवकाचे गीत -**

सोलापूर येथे इ.स.१९२० मध्य मुंबई इलाखा प्रांतिक परिषद भरली तेव्हा 'माझे ध्येय' ही कविता रचली, "ध्येय एक निश्चित झाले । मी सेवक या राष्ट्राचा।" अशी केली. 'माझे ध्येय' या कवितेमध्ये स्वतःची भूमिका मांडली आहे. ती भूमिका एका राष्ट्रभक्ताची होती. म्हणून ही कविता सर्व प्रांतिक परिषदेची, स्वयंसेवकांचे, राष्ट्रभक्ताचे गीत बनले. ते गीत एक स्वयंसेवकांचे गीत आहे.

"ध्येय एक निश्चित झाले । मी सेवक या राष्ट्राचा
ईशाची बहु दिवसांची । ही आर्यभूमि लडिवाळ
प्रेमाने सुखदुःखाचे । खेळली त्यासवे खेळ
संकटी पाहुनी तिजला । प्रभु करी तिचा सांभाळ
भूभार हरण करण्याला
तो राघव रविकुलि झाला
श्रीकृष्ण हंसुनि तिस वदला
की सेवक मी राष्ट्राचा ।" गीत पृ.४६

**१७) सहकार गीत -**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गीत पृ.४६ स्वतंत्र भारताची आर्थिक परिस्थिती सुधारणे हे सरकार पुढील आव्हान होतो. त्यासाठी सहकार क्षेत्र ही काळाची गरज होती. कुंजविहारींनी सद्यस्थितीला अनुसरून हे सहकारगीत लिहले आहे. या गीताचा मथळा 'सहजीवन शांकरी' असाही आहे. गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे,

"प्रसन्नते जय स्वतंत्रते जय सहजीवन शांकरी
होऊ दे राज्य तुझे भूवरी

शक्ति शिवाची गणराज्याची माता सहकारिता
प्रजाजन भक्त तिचे तत्वता ।।" आ.पृ.७३

**१८) वर्णनपर कविता -**

सोलापूरमधील महत्त्वाची ठिकाणे व देव देवता यांचे वर्णन केले आहे. कुंजविहारींची ही वर्णनशैली 'सोलापूर वर्णन' या कवितेत दिसून येते.

"सोलापूरच्या ग्रामदेवते श्री सिध्देश्वर तुला नमूं
हर हर हर महादेव गर्जूनी रेवणसिध्दा तुला नमूं
स्वरूप दिधले जगा जियेने चित्‌भक्ती ती मनी नमूं
तुळजापूरची वाट दाविशी रूपाभवानी तुला नमूं" आ.पृ.२६

**१९) भुजंगप्रयात वृत्त -**

" भुजंगप्रयात या नमो मायभूमी ही कविता लिहली आहे.
गुलाबी छटा पूर्वभागी विराजे । निशानाथ हा भासवतो हीन तेजे
तशा तारका लोपल्या सर्व व्योमी । तुला सुप्रभाती नमूं मायभूमी.गी.पृ.२

**२०) दिंडी -**

दिंडी या 'पंढरीच्या पांडुरंगास' ही कविता लिहली आहे.
"दिली दगडाला देवकळा ज्यांनी
मराठ्यांच्या महशूर पूर्वजांनी
धन्य सज्जन सद्‌भक्त तत्वतेचे
अनंताचाही अंत जाणती ते ।" गी.पृ.१७

**२१) अनुष्टुभ -**

अनुष्टुभ या कै.जगन्नाथ मोरेश्वर सामंत ही कविता लिहली आहे.

"शांतवी कुंजविहारी
गाऊनी विरही जनां
अंतरी भावना न्यारी
आणिते अश्रू लोचना"                 गीत पृ.९२

कुंजविहारींच्या काव्यशैलीचे महत्त्वाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी वेगवेगळे काव्यप्रकार लिहले आहेत. लोकांना रोजच्या परिचयाचे, म्हणावयास सुलभ जाणारे व आठवणीत राहणारे असे काव्यप्रकार हाताळले आहेत. जेणे करून राष्ट्र उभारणीसाठी आपल्या ऐपतीपरी कवितेतून हातभार लावावा ही कुंजविहारींची भूमिका होती. कुंजविहारींनी स्वागतगीत, आरती, स्तवन, भूपाळी, गोंधळगीत, पोवाडा, भजन, प्रार्थना, पौराणिक कथागीत, वचने, पाळणा, शेतकऱ्यांचे गाणे, लावणी, ओव्या, अभंग, स्वयंसेवकाचे गीत, सहकार गीत, वर्णनपर कविता तसेच भुजंगप्रयात, दिंडी, अनुष्टुभ या प्रकारातही काव्यरचना केली आहे. कवितेच्या संख्येच्या तुलनेने कुंजविहारींनी हाताळलेले काव्यप्रकार विविध आहेत. याचाच अर्थ त्यांची कविता मोजकी परंतु विविधतेने नटलेली आहे. म्हणूनच ती जनमानसावर परिणाम करणारी आहे.

**२) काव्यातील रस**

**अ) भक्तिरस**

**१) स्वातंत्र्यभक्ती (प्रेम)**

कुंजविहारींच्या जीवीत कार्याची धडपडच मुळात देशाला पर्यायाने प्रत्येक



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व्यक्तीला स्वातंत्र्य मिळावे ही होती. या तळमळीतूनच साहित्य निर्मिती झाली आहे. स्वातंत्र्य मिळणे म्हणजे परकीय सत्ता नष्ट होणे आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतर खऱ्या अर्थाने प्रत्येक व्यक्तीला स्वमनाने जीवन जगता आले पाहिजे. अशा सुराज्याच्या कल्पनेसाठी, ती अस्तित्वात येण्यासाठी कवींनी राष्ट्रीय लिखाणाचा व चळवळीचा लढा शेवटपर्यंत चालू ठेवला. कवीच्या मनात स्वातंत्र्याचा खरा अर्थ दडून बसला होता. ही स्वयंपूर्ण, स्वतंत्रतेची भावना अध्यात्मामधेही दिसून येते.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर या कालावधी मध्ये ही स्वतंत्रभक्तीची ज्योत तेवत ठेवली. स्वातंत्र्य भक्तीच्या छटा त्यांच्या काव्यात पहावयास मिळतात. ईश्वरापर्यंत पोहचण्यासाठी जशा पायऱ्या आहेत; साधक - ईश्वरप्राप्तीचा आनंद-अन्य जनांना सामावून घेवून प्रबोधन करणे. तसेच स्वातंत्र्यभक्तीच्या छटा इथेही दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीची तळमळीची भावना-स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद- हा आनंद व्दिगुणीत करण्यासाठी भारतीयांना उपदेश करतात. कुंजविहारींच्या मनात स्वातंत्र्यभक्ती काठोकाठ भरून उरली आहे. ते अनुक्रमे पाहुया -

**i) स्वातंत्र्य प्राप्तीची तळमळीची भावना -**

स्वातंत्र्य एक मूल्य आहे. व्यक्ती, समाज, राष्ट्र यांच्या जीवनात त्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्याची भावना जागविणे हे कुंजविहारी यांच्या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ते पुढील कवितेतून पाहूया- कुंजविहारींनी 'भारतास' या कवितेत पूर्वजांच्या पराक्रमाचे, त्यांनी मिळविलेल्या स्वातंत्र्याचे महत्व सांगितले आहे.

"त्या काळी आर्यावर्त । माहेर गमे विदयेचे
स्वातंत्र्य जयाचे गेले
ते जिवंत असुनी मेले ।

की प्रेताची ते सजलेले । .....

.....दावुनी पराक्रम बरवा ।

वरि निर्मल स्वातंत्र्याला । नरवीर भारतबाळा ।" आ.पृ.५,६

पूर्वपरंपरेत जसी स्वतंत्रता कवीला दिसते. तशी ती निसर्गातूनही दिसते. 'नमो मायभूमी' या कवितेमध्ये कवी म्हणतात -

"किती गोड हा जन्म या पाखरांचा । सुखाचा गुणाचाहि स्वतंत्रतेचा ।" आ.पृ.४

ब्रिटीशांनी भारतातील सर्व वैभव लुटून नेले म्हणून 'संध्या' कवितेत कवी शुध्दभावाने मागणे मानतात.

"संध्या समयी सकल जगाचा साक्षी वंदावा

शुध्द मनाने स्वातंत्र्याचा प्रसाद मागावा" गीत पृ.५

'बाळ टिळक' या कवितेमध्ये कवी स्वातंत्रतेचा महामंत्र सांगतात.

"स्वतंत्रता ही ज्यांची त्याने स्वतःच मिळवावी

गुरूजन म्हणती 'केवळ आम्ही वाट दाखवावी ।' " गीत पृ.८९

स्वातंत्र्याचे वेड पुरूषांनाच आहे असे नाही तर स्त्रियांनाही हवे आहे. कवींची वीरांगणा 'गडे मज संगे घेऊन चला' या कवितेमध्ये म्हणते -

"लढुनि रणांगणि विजय मिळवुनि, सुखविन दोन्ही कुळां

गडे मज संगे घेऊन चला." गीत पृ.४५

'महात्मा गांधीगीत' या कवितेत गांधी अटक झाल्यानंतर जनतेला स्वातंत्र्याचे आवाहन करतात.

"सोडवा शीघ्र आम्हा तुम्ही होऊनी स्वतंत्र

स्वावलंबन स्वाभिमान हाच स्वातंत्र्याचा मंत्र

प्रताचे उदयापन तीच स्वातंत्र्याची खूण"          गीत पृ.९३

'भेटेन नऊ महिन्यांनी' ही कविता तर अत्युच्च स्वातंत्र्य भक्तीची आहे.

"स्वातंत्र्य मला मिळेल मग कोठुनि । भेटेन नऊ महिन्यांनी

..... मागेन हेच श्रीहरिला

मातृभूमि उध्दरण्याला

स्वातंत्र्यरणी लढण्याला"          आ.पृ.२८,३०

'रत्नागिरी परिषद' या कवितेत स्वातंत्र्याची भक्ती उत्कट होते.

'आर्य जनापरि स्वतंत्र व्हाया धडपडतो दर्या

स्वतंत्रतेचे साधन शिकवी श्री शिवभूपाल'

'चिमणा शूर शिपाई' या कवितेतील स्वातंत्र्य प्रेमाचे सौंदर्य पहा -

"खुल्या दिलाने तया खेळु दे. दिनकर किरणा संगे

स्वतंत्र निर्भय फुले विहरती उघड्यावर राणी"          गीत पृ.४३

'सुदिन' कवितेत स्वातंत्र्यभक्ती आहे. म्हणूनच वीराला सांगतात की,

"मृत्यूच्या खेळगड्यांना । जगि नुरे कुणाची भीती

शुभागमन स्वातंत्र्यदेविचे  तोडितसे शृंखला

..... नव उज्वल स्वातंत्र्याची । करिशील गर्जना केंव्हा

त्या नव समया गोण्यासाठी शक्ती दयावी मला"          आ.पृ.३१,३२

'तानाजीचा पोवाडा' मध्ये कुंजविहारींच्या मनात स्वातंत्र्यभक्ती आहे म्हणून भारतीयांना लढायला सांगतात ,

"गोंधळी बनुन तानाजी । स्वातंत्र्यपोत पाजळिला

जन तेथिल भाविक भोळे । क्षणि फितूर झाले त्याला

... जगदंबा भक्ता हाती । नि:पात करी शत्रूचा

फडकला गडावर झेंडा । स्वाभिमान स्वातंत्र्याचा"        आ.पृ.४०

स्वातंत्र्यभक्तीमुळे 'शिवरायाची आरती' मध्ये पंचाक्षरी मंत्र सांगतात - "हा पंचाक्षरि भय हरि स्वतंत्रतामंत्रे" स्वातंत्र्यभक्तीने मुक्ती मंदिराचा मार्गही 'रणांगण ग्रंथ इथे संपला' कवितेमध्ये सांगतात,

"प्रथम हरिकथा, स्वतंत्रता मग सावधानता पुढे

मार्ग हा मुक्तिमंदिराकडे"        आ.पृ.४३

या भक्तीपोटीच 'मुजरा' कवितेत माधवा विनंती केली आहे.

"भारतिया स्वातंत्र्यरणांगणि दाखवि पथ बरवा ।। माधवा ।।"

आ.पृ.४८

स्वातंत्र्यप्रेम मृत मानवतेला जिवंत करते 'तयाला तुरूंग भिववील किती?' या कवितेमध्ये दिसून येते.

"स्वातंत्र्य स्फूर्तिचे सिंचुनि अमृतकण

मृत मानवतेला आणित संजीवन"

उत्कट स्वातंत्र्य भक्तीमुळेच 'नव्या जगाच्या निर्मात्यांनो' मध्ये स्वतंत्रतेचा नवा अर्थ समजून देत.

"स्वातंत्र्योत्सुक प्रगति प्रेमी शांतिनिष्ठ अति ध्येयमती

नव्या जगाच्या निर्मात्यांनो अनंत नमने तुम्हांप्रती

... स्वतंत्रता नच स्वार्थ आसुरी ते जीवनसौंदर्य नवे

स्वतंत्रता-संग्राम-मार्गी नच राजविलासा मुळी थारा"

आ.पृ.५४

स्वातंत्र्यभक्तीत प्रसंगी मरण पत्करण्याची तयारी असावी 'जयहिंद' मध्ये असे सांगतात.

"रणमरणाची दीक्षा स्वजनाला दयावी

स्वदेश स्वातंत्र्याची शुभ गुढी उभरावी ।"

अशाप्रकारे कवीने स्वातंत्र्याच्या प्रेमामुळेच स्वतंत्रतेचा मंत्र तत्त्व, ईप्सित, आवाहन कवीने केले आहे.

**ii) स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद -**

देशाला स्वातंत्र्य मिळाले अनेकांनी स्वातंत्र्यासाठी आत्मसमर्पन केले. या कष्टाला, प्राणाला आज फळ आले होते. आनंदी आनंद झाला. या आनंदातून कवींच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा भाव व्यक्त करणाऱ्या कविता लिहल्या. हा आनंद स्वातंत्र्य भक्तीचाच भाग आहे. 'स्वराज्य सोहळा' मधील आनंदी भावना -

"मुखामुखावर लखलखते कशि सौभाग्याची कळा

स्वराज्यमंदिर शिवशक्तीचा आज लग्न सोहळा

समता, ममता, स्वतंत्रता मन निजसामध्ये सजे

ज्ञानज्योतिंनी नवजीवन पथ सदैव हा उजळिला" आ.पृ.५७

'स्वराज्य नारायण' या कवितेत आनंद व्दिगुणीत झाला आहे.

"स्वतंत्र भारत स्वतंत्र भारत स्वतंत्र सारेजण

आज पूजु हा शाश्वत भूषण स्वराज्य नारायण

स्वतंत्रता ही शक्ति शिवाची शिवरायाची कथा ।" आ.पृ.६०

रामराज्य यावे अशी कुंजविहारींची मनापासून इच्छा होती. 'ही भक्ती','गा रे गुणवंता' मध्ये दिसते. "रामराज्य होऊ दे बघु तो शाश्वत आनंद" या स्वातंत्र्यभक्तीने 'राजधानी' या ठिकाणाचाही गौरव केला आहे.

"हे 'सत्य' ही अहिंसा गणराज्य लोकशाही

सत्कर्म-धर्म-योगी । सर्वात्म भावना ही



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

ब्रम्हांड व्यापुनी ती । बहरी फुलाफळांनी
ज्ञानी प्रजा जनांची । दिल्लीत राजधानी ।"                आ.पृ.६५

या भक्तीपोटीच भारतीय लोकशाही सर्वश्रेष्ठ व्हावी. ही भावना 'चिरंजीव होवो जगी लोकशाही' या कवितेमध्ये व्यक्त केली आहे.

तुला सुप्रभाती असे प्रार्थना ही । चिरंजीव होवो जगी लोकशाही. 'होळी' या कवितेमधून स्वराज्यासाठी आत्माहुती करावी तेव्हा स्वराज्य आनंद मिळेल हे सूचकतेने सांगितले आहे.

"सण शिमग्याचा विघ्न घडीचे गुढीपाडवा पुढे
आनंदाचे नव नंदनवन फुलेल चोहीकडे"                आ.पृ.७७

स्वातंत्र्याचा पुनःप्रत्यय आला. तो 'प्रतापगडवासिनी' या कवितेमध्ये व्यक्त केला आहे.

"स्वराज्य पाऊलवाट उमटली वैर अराजक पळे
सूर्य उगवला अंधाराचे पटल विरूनि गेले
त्या सूर्याची सहस्त्र किरणे धावति दाही दिशा
जनी वनी मनि स्वभावसुंदर स्वातंत्र्याचा ठसा"                आ.पृ.७८

अशाप्रकारे स्वातंत्र्य भक्तीमुळेच स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद कुंजविहारींना झाला आहे.

**iii) स्वराज्याचे सुराज्य करण्याची भावना -**

स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी भारतीयांनी तत्त्वांना कृतीत आणले पाहिजे. ही तत्त्वे कोणती? हेच काही कवितेतून कुंजविहारींनी सांगितले आहे. स्वातंत्र्यभक्तीमुळेच हे कवी सांगू शकतात. 'सुराज्य झाल्याविना' या कवितेत कवी म्हणतात.

"स्वराज्य झाले म्हनुनि भारता गर्व वाहसी वृथा.....

..... निजनिष्ठेने जनगणमंगल स्तवावयाला शिका.....

.....सुराज्य झाल्याविना । वृत्ताची कधी न हो सांगता" आ.पृ.६१

स्वराज्य होण्यासाठी 'युगवीर भावना' असायला हवी "विवेकवादे साहुनि संकट । भारत-हित-रत होऊ या" 'स्वराज्य रथ सारथी' या कवितेत सुराज्य होण्याची भावना व्यक्त केली ती अशी -

"सहजीवन संजीवन मंत्रे मिळे यशश्री कोटिगुणे

आचरूनी सत्कर्म योग नित मार्ग दाविती लोकमत

स्वराज्य रथ सारथी आमुचे घ्याऊ गाऊ पाहू अता" आ.पृ.७२

'सहकारगीत' ही कविता सहजीवन सांगते.

"प्रसन्नते जय स्वतंत्रते जय सहजीवन शांकरी

सौजन्य जन्म दे लोकशाहिच्या कुशी

घडो लोककल्याण भारती दुःख दैन्य हे हरी

होऊ दे राज्य तुझे भुवरी" आ.पृ.७३

स्वातंत्र्याच्या भक्तीपोटीच कवींना प्रश्न पडला. 'उदयाचा देव असावा कसा' या कवितेत त्याचे सुंदर वर्णन आले आहे.

"नमस्कार गणराज्य सभाजन सुखासनी या बसा

प्रश्न आपुल्यापुढे उदयाचा देव असावा कसा." आ.पृ.८२

जगजागृती हेच या काळात महत्त्वाचे राष्ट्रीय कार्य आहे. 'बंडखोर स्फुर्ति' मध्ये कवी म्हणतात.

"स्वातंत्र्याचे दीर्घ सूत्र ते रक्ताने रंगले

स्वातंत्र्यास्तव लढू करून कृतकर्माचे क्षालन

स्वातंत्र्यास्तव जगणे मरणे दैवी गुणसंपदा." आ.पृ.७९, ८०

'सैन्य चालले पुढे' या कवितेत ध्येय सात्त्विक असावे अशी भावना आहे.

"स्वतंत्रतेचे श्रीमुखमंडल न हो मलिन हे ध्येय जिथे

देव तिथे तो धर्म तिथे तो विश्वकुटुंबी प्रेमतिथे" आ.पृ.८८

वरील सर्व तत्त्वगुणांचा अवलंब भारतीयांनी केला तर युगवीर भावना, चिरंजीव होण्यास वेळ लागणार नाही. स्वातंत्र्याचा खरा अर्थ स्वातंत्र्य भक्तीमुळेच भारतीयांना पटवून दिला आहे.

**iv) अध्यात्मातून सांगितलेला स्वतंत्रतेचा अर्थ -**

अध्यात्मातून अध्यात्म पातळीवरचा स्वतंत्रतेचा अर्थ सांगितला आहे. यामुळे स्वातंत्र्य भक्तीला भक्कम आधार मिळाला व लोकांना ते सहज पटले. वैयक्तिक सामाजिक, मानसिक, पातळीवरही स्वतंत्रता असायला हवी हा कुंजविहारींचा आग्रह होतो तो त्यांच्या पुढील कवितेतून पहावयास मिळतो - 'स्वयंवर' या कवितेत स्वतंत्रतेचे प्रेम, पुराणकथेतून किती बेमालूमपणे रेखाटले आहे ते पुढील ओळीतून पाहूया -

"एकुलती एकली कन्यका स्वतंत्रता रूक्मिणी"

"स्वतंत्रता-रूक्मिणी हरण करि आर्य घन सावळा"

'पत्र पाहुनि चैन पडेना स्वतंत्रतेवाचून

स्वराज्य मौक्तिक मालेसह उभि जगदंबा मंदिरी"

"विजयी भारत हरण करिल ती स्वतंत्रता तोवरी"

"खेड्यांपाड्यामधी जाऊनी जागृत जनता करा

स्वतंत्रतेसह येईल श्रीहरि आज आपुल्या घरा" गीत पृ.२५,२६,२७

'सावित्रीगीत' मध्ये सावित्रीने पतिनिष्ठेने यमापासून पुन्हा पती सौभाग्य आणले. अशीच स्वातंत्र्यशक्ती भारतमातेचे सौभाग्य आणण्यासाठी हवी आहे.

"यमधर्मावर विजय मिळवुनी पति आणि मागती

भारतभूमिला भूषण बनली श्री सावित्री सती" आ.पृ.३६

'सुस्वागतम' या कवितेत कवीने ईश्वराला सुध्दा स्वतःचे मन दिले नाही. आध्यात्मिक, मानसिक पातळीवरची ही स्वतंत्रता आहे.

"हृदयभुवनि ठेविन परि भीति वाटते
तू प्रेमळ परमेश्वर
परि म्हणविशि चित्तचोर
मी-मजला मुकल्यावर
कुठला संसार सार्
म्हणुनि नयनि वास करी मम मनोहरा" आ.पृ.४२

'शारदास्तवन' मध्ये शारदेला भारताचे सौभाग्य मागितले आहे.

"भूषवि जी संसार सुरंगा । सौभाग्याची गंगा
भाव कोमला स्फूर्ति अभंगा । ज्योतिर्मयी भवानी" आ.पृ.४७

'महाराष्ट्र सद्गुरू' मध्ये श्री समर्थाकडे स्वतंत्रतेचे सुख मागितले आहे.

"प्रथम प्रपंची स्वतंत्रतासुख शांती संपादणे
मागुति शुभ सर्वस्व विवेक परमार्थी राहणे" आ.पृ.४९

'महावीर' या कवितेतही स्वातंत्र्यभक्ती दिसते.

"सत्य अहिंसा प्रेम पाठिशी । ध्वज मानवता घेऊ ।
परावलंबी जिणे न जाणे स्वातंत्र्यतेची मातबरी" आ.पृ.१०१

स्वातंत्र्यभक्ती ही भावना व्यक्त करत असता कुंजविहारींनी विषय, आशय या सर्वांना स्वातंत्र्य प्रेमाकडे वळविले आहे. त्यामुळे त्या भावनेला उच्च तात्विक, अध्यात्मिक शुध्द स्पर्श झालेला आहे.

**२) राष्ट्रभक्ती -**

राष्ट्रभक्ती हा कुंजविहारींचा स्थायीभाव आहे. तेच त्यांचे ध्येय आहे. त्याच ध्येयावर ते शेवटपर्यंत् ठाम उभे होते. त्यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालीन काव्यात ही राष्ट्रभक्ती कायम आहे. फक्त तिचे स्वरूप थोडे बदललेले दिसून येते. त्यांची राष्ट्रभक्तीवरची निष्ठा या जन्मात तर आहेच परंतु ती निष्ठा जन्मोजन्मी असावी असेही व्यक्त केले आहे. राष्ट्रभक्तीनेच स्वातंत्र्य मिळविले व ते स्वातंत्र्य सर्व स्तरातील लोकांच्यापर्यंत पोहचावे ही त्यांची तळमळ खरी राष्ट्रीय भावनाच व्यक्त करते. या वरील तत्त्वासाठी कवीने आयुष्यभर राष्ट्राची 'ऐपतीपरी' सेवा केली. ही भक्ती कुंजविहारींच्या काव्यात शब्द व भाव सौंदर्याने चित्रित झाली आहे ते पुढीलप्रमाणे पहा.

कुंजविहारींची राष्ट्रभक्ती पूर्ण जीवनभर आहे. त्यांच्या जीवनाचे ध्येय सुध्दा राष्ट्राला समर्पित केले आहे. ते 'माझे ध्येय' या कवितेतून दिसून येते. त्यांच्या ध्येयाला एक दिशा प्राप्त

झाली. "ध्येय एक निश्चित झाले । मी सेवक या राष्ट्राचा" कुंजविहारींची राष्ट्रभक्ती व्यापक रूप धारण करते व स्वतःतील स्वार्थाला नष्ट करू पाहते.

"तो असो कुणीही कसला<br>
मी करीन तत्सेवेला<br>
हा धर्मचि माझा ठरला<br>
की सेवक मी राष्ट्राचा" आ.पृ.३

राष्ट्रभक्ती स्वार्थरहित असायला हवी हे महत्त्वाचे आहे.

"हा स्वार्थधूप जाळून<br>
ओवाळुनि पंचप्राण



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

की सेवक मी राष्ट्राचा"          आ.पृ.३

राष्ट्रकार्यात गांधीच्या बरोबर इतरही सामान्य लोकांनी झोकून दिले. ते 'महात्मा गांधीगीत' मध्ये पहावयास मिळते.

"पितापुत्रनाथ बंधु रत राष्ट्रकार्यी सारी
हातभार लावू त्यांना आम्ही कुलवती नारी"          आ.पृ.९३

'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेत राष्ट्रभक्त पुन्हा ९ महिन्यांनी येणार परंतु या कालावधीत राष्ट्र सेवेला मुकणार यांचे दुःख व्यक्त केले आहे.

"तव सेवेला अंतरलो मी जननी । भेटेन नऊ महिन्यांनी"          आ.पृ.२९

राष्ट्रभक्ती ही स्वार्थ विरहित परमार्थावर अवलंबून नसावी असे 'तरूण भारतास' मध्ये सांगितले आहे.

"स्वार्थ नको परमार्थ न ठावा निज राष्ट्राची करू सेवा
आत्मोन्नतिचा देशहिताचा मार्ग सुखाचा बहु बरवा"
"राष्ट्रकार्यी तनमनधन अर्पूनि अजरामर सत्कीर्ति वरूं ।" आ.पृ.२२,२३

'रत्नागिरी परिषद' मध्ये राष्ट्रभक्ती ही आई-मुलाप्रमाणे असावी मुलाने त्याची कर्तव्ये करावीत हे सूचित केले आहे.

"राष्ट्रमाऊली भारतभूमी आम्ही तिचे कुमर
मर्दुमकीचा महाराष्ट्र हा जगात महशूर
बड्या-बड्यांच्या भांडणात मज घालू नको देवा
घडो ऐपतीपरी काहीतरी राष्ट्राची सेवा ।"          आ.पृ.२४,२५

प्रत्येकाने आपल्याला मानवेल त्या पध्दतीनी राष्ट्रभक्ती करावी यासाठी प्रेम, अभिमान, श्रध्दा असावी हे 'धरि हृदयी अग्नीज्वाले' या कवितेत सांगितले आहे.

"हा पुतळा प्रेमलतेचा

मर्दानी अभिमानाचा

शाहीर गडी राष्ट्राचा

दृढ श्रध्देचे विमल सुमन सुकलेले । धरि हृदयी अग्नीज्वाले ।" आ.पृ.३५

देशासाठी समर्पित भावना असावी घर व कारागृह अशा लोकांना सारखेच त्याची भीती बाळगू नये असे 'तयाला तुरूंग भिवविल किती?' या कवितेत कवी म्हणतात.

"देशास्तव सर्वस्व समर्पित ध्येय जयाचे निके

तया गृह कारागृहासारिखे" आ.पृ.४६

कुंजविहारींची भूमिका साहूंनी व्यक्त केली आहे ती 'गा रे गुणवंता' या कवितेत कवीने अनुवादित केली आहे.

"मातृभूमीच्या दु:खाने तू दु:खित झालासी

कधि रडलासी कधि लढलासी कधि बावरलासी

हृदय तुझे ते रसरसलेले स्वदेश अभिमाने

अभिमानाचे झाले जळत्या दु:खाचे गाणे" आ.पृ.६३

'सहकारगीत' मध्ये राष्ट्रभक्तीची वेगळीच छटा व्यक्त केली आहे.

"सहयोगी समयोगी सन्मति देवी गुणसंपदा

निवारी पाप ताप आपदा

पाहिजे प्रपंची राष्ट्र प्रपंची तशी

मति निति निपुण कृति सुवर्ण बावनकशी ।" आ.पृ.७३

सहकाराबरोबर परिश्रमाचाही राष्ट्रभक्तीत अवलंब करायला हवा हे 'धन्य आजचे तरूण' मध्ये सांगितले आहे.

"मातृभूमिचे प्रेम उसळूं दया परिश्रमे या क्षणी

स्वराज्यात ना दीन दरिद्री भुककंगालहि कुणी ।" आ.पृ.७१

'बंडखोर स्फूर्ति' काव्यात राष्ट्रासाठी जगणे मरणे असावे असे सांगितले आहे. तेव्हाच ती खरी राष्ट्रभक्ती असेल

"स्वातंत्र्यास्तव जगणे मरणे दैवीगुण संपदा

आत्मशक्तिचे राष्ट्रभक्तिचे पुढेच पाऊल सदा ।" आ.पृ.८०

'नव तरूणास' या कवितेत कवीने तरूणास जीवित व वित्त वेचण्याचे आवाहन केले आहे. तीच खरी राष्ट्रभक्ती होय -

"गत शतकाच्या इतिहासाच्या ऐकुनि आक्रंदना

शिवसंकल्पे राष्ट्रकारणी प्राण लाविता पणा

स्वजनहितास्तव सध्दर्मास्तव सत्कर्मास्तव जिणे

दीन दुबळयांसाठी जीवित-वित्तही ते वेचणे." आ.पृ.८६,८७

राष्ट्रभक्तीसाठी शुध्द तत्त्व व शुध्द कार्य आवश्यक असते तेंव्हा ती खरी राष्ट्रभावना. राष्ट्रभावनेचे भावसौंदर्य कुंजविहारींनी मोजक्या शब्दात सांगितले आहे.

**ब) वीररस -**

राष्ट्रीय काव्य म्हटले की, राष्ट्राभिमान आला व तो जोपासण्यासाठी संघर्ष हा स्वाभाविकपणे आला. संघर्ष समर प्रसंग म्हटले की, तिथे त्वेषाने लढणारे वीर येतात. वीरांगणा अवतरतात. आणि या युध्दातून समर प्रसंगातून ओघाने वीररस अवतरतो. भारभूमीमध्ये स्वातंत्र्याचे अग्नीकुंड पेटले होते. त्यात प्रत्येकजण जमेल तशी समिधा टाकत होते. या अग्नीकुंडात समर्पित होण्यासाठी लोकांच्या मनात जागृती निर्माण केली गेली. लोकांना आव्हाहन केले गेले. कुंजविहारी या परिस्थितीच्या बाहेर नव्हते. त्यांनीही आपल्या काव्यातून वीर रसाची भावना जागृत केली. यामुळे अनेक नव तरुणांनी हे आव्हान स्वीकारले. एवढी मोठी जबाबदारी त्या काळातील राष्ट्रीय काव्याने, कवीने सांभाळली. हीच या काव्याची यशस्वीता आहे.

'गोंधळ' या कवितेत तानाजी मालुसरे या वीराचे वर्णन केले आहे ते असे -

"परवशतेला ठोकर हाणुनि पाताळी रगडी सिंहगडी नांदतो तान्ह्या मालुसरे वीर" आ.पृ.७ वीरांची नावे ऐकली तरी त्यांच्या कार्याने वीरश्रींचे स्फुरण निर्माण होते. या वीरांच्याच हा गोंधळ आहे.

"मुरारबाजी पुरंदरी करि राखण चौफेर

पावनखिंडीत मुजरा केला त्या बाजी प्रभुसी जगी तुझा महशूर शिवाजी भक्त जातिवंत

मर्दूमकीचा गोंधळ घालित मावळखोऱ्यात." आ.पृ.७

भारतास कवितेत पूर्वजांची मर्दुमकी सांगितली त्यातून प्रेरणा घेऊन नव तरूण उठतील एवढीच अपेक्षा.

होते तव पूर्वज कैसे । विख्यात रणी रणधीर

लोकोत्तर विद्वत्ता ही । जाहली जगी महशूर

आमच्या आजापणजांना । मृत्युही होता भीत"

तू नरवीरांचा छावा दावुनी पराक्रम बरवा" आपृ.५

'बाळ टिळक ' या काव्यात टिळकांचे चित्रण आले आहे.

"मंत्र, मग कथिल विश्वास

स्वराज्य आहे जन्मसिध्द मम हक्क मिळविणार

चैतन्याची ज्योत पेटवी 'केसरि' जनतेत" गीत पृ.८९

'श्री सत्यविनायक ' काव्यातून वीररसाची निर्मिती सहजपणे झाली आहे. एक सच्चा वीर मातृभूमीचे रक्षण करणारा इथे चित्रित केला आहे. त्याची महती गायली आहे. गणपती श्री शंकराला म्हणतो यातून वीररसाचे दर्शन होते.

" मरणाचे भय मला दाविशी काय म्हणुनी नीचा

मृत्युला प्रिय मित्र मानतो शूराचा बच्चा"

"शूर वीर सच्छील जनांनी ऐकावा गावा" आ.पृ.२० २१

'गडे मज संगती घेऊन चला' या काव्यात वीरांना समरात जाण्यासाठी नौबत झडली आहे. परंतू तिने त्याच्या बरोबर येण्याचा हट्ट धरला. ती एक वीरांगणा होती. तिच्याकडे आत्मविश्वास होता.

'लढूनि रणांगणी विजय विळवूनि सुखविन दोन्ही कुला ।

गडे मज संगे घेऊन चला.। गीत पृ.४५

'भेटेन नऊ महिन्यांनी' या काव्यातला वीर फासाला सिंहासन समजतो व हसत शांतपणे फासावर जातो. वीररसाचे बोलके उदाहरण आहे.

"मजसाठी तिने सिंहासन निर्मियले । त्या एका खांबावरले

मी वरी गडी चढेन गेल्यावरती । इतरांची छाती नाही"

वर जाइन मी लाथ जगा हाणोनी । भेटेन नऊ महिन्यांनी" आ.पृ.२९

'तरूण भारतास' या काव्यात कवीने नव तरूणांना प्रोत्साहन दिले आहे.

"तडफदार तरूणांविन नादिसे आर्यभूमिचा कुणि वाली नव्या दमाचे खुल्या दिलाचे शूरवीर जे मानधन सुशील सद्‌गुणि तरूणावरती इतिहासाचे फिदा मन" #

आ.पृ.२२

'सुदिन' हे काव्य शिवाजीच्या पराक्रमावर लिहले आहे. शिवाजी व त्यांचे मावळे हे वीर, नव वीरांना नक्कीच प्रेरणा देतील त्यांचे वर्णन -

"धावती तरूण समरांत घेऊनी शीर तळहाती मृत्यूच्या खेळगड्यांना ।

जागी नुरे कुणाची भीती । 'शूर दिलाच्या वीर वृत्तिच्या तरूणांची टोळी

शिवाजी जमवित भवताली । दडी धरूनि धरूनि बेधडक शत्रुवर चालुनिया जाती ।

रणधीर मावळे वीर मांडती रणी रणयज्ञ । आ.पृ.३१

असे शिववीर होते म्हणूनच सुदिन पहावयाला मिळला. 'वंदेमातरम्' या काव्यात भारतवीरांचा त्यांच्या वीरवृत्तीची अभिमान व्यक्त केला आहे.

"जेथे रानफुला समान फुलती स्वातंत्र्यवीराग्रणी
जेथे प्राण तृणासमान गणिती सध्दर्म संरक्षणी
सत्याचा अभिमान वागवि सदा पाषाणही एकला" आ.३४

'मराठागडी यशाचा धनी' या काव्यात वीर तानाजी मालुसरे यांचे वर्णन राजांनी केले आहे. 'यशवंत वीर नरसिंह ही सांग कामगिरी' त्याला असे राजांनी केले आहे.

"रणवीर निघे झुंजार । स्वसुखावर हाणुन लाथ ।
शिकविली शिस्त शिवबांनी । अनुयायी आचरतात
मृत्युंजय जयवंत मराठी बाणा मर्दानी । मराठा गडी यशाचा धनी" आ.पृ.३९

'श्री शिवरायांची आरती' या आरतीतून त्यांची अवतारी वीरता दिसते. संयमित वीरांचे दर्शन घडते. जय जय श्री शिवराया अवतारी वीरा सेनापती बापू गोखला यांचे शौर्य रणांगण ग्रंथ इथे संपला या काव्यात दिसते ते असे,

मुख पृष्ठावरी चित्र भवानी समशेरीचे दिस दिसे । भोवती नररूंडाचे ठसे
लिहीत मराठी मनगर मोडी लिपीत नामावली । जीवी तरेती वर पसरली ।।
आधुनिक विर-तयाला तुरूंग भिवतील किती ? आ. ४३

या काव्यात चित्रित केला आहे. वीराचे लक्षण सांगितले ते असे.

सूर्यमालेसम लोहशृंखला मानित जो सर्वदा । तयाला काय करिल कायदा ।
स्वार्थ त्यागी विषयविरागी मर्द मानधन असा । शत्रुला शिर नमविल तो कसा
आ.पृ.४६

अंहिसा सत्याग्रह आदितत्त्वाचा आग्रह धरणारा गांधीजी या वीराचे वर्ण 'टाक पुढे पाऊल' या काव्यात आले आहे.

"शौर्य धैर्य औदार्य मंत्रमय ध्वज उभवावा रणी
पुरे आत्मविश्वास एकला सैनिक संरक्षणी"
"विवेकवादी विश्वमित्र तू सुशील सत्याग्रही
एकली चाल 'मोहेंना' वंदील सारा मही." आ.पृ.५३

'जयहिंद' या काव्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या तत्त्वाविषयी लिहले आहे. यातून ओजस्वी वीररस दिसतो.

"मरेल अथवा मारिन कृतनिश्चय ज्याचा
श्रीहरि अंतरसाक्षी सहकारी त्याचा
साहसवृत्ति गवसणि गगनाला घाली
विरोध - विष सेवनि ही सन्मति ना ढळली
संकट कंटक पदललि तुडवित बलशाली
दिल्ली चलो गर्जना घुमतवित भवताली" आ.पृ.५६

'युगवीर भावना' मध्ये वीर भावना मानवतेचे समानतेचे रूप घेवून आली आहे.

बुध्द वीर जिन हरिहर अथवा ब्रम्ह म्हणा ।
स्वाधीन म्हणा सर्वाठायी साम्यभावना नसे वासना विषयाची ।
स्वार्थ त्याग तपस्या खडतर सहज सुखे जे आचरिती ।
ते ज्ञानी ते साधू जगाला दुःख कर्दमी उद्धरिती । आ.पृ.६७

वीरांकडे बंडखोर वृत्ती असायला हवी त्याशिवाय परिस्थितीमध्ये बदल घडून येत नाही. 'बंडखोर स्फुर्ती' या काव्यात कवी म्हणतात.

"बंडखोरमति तिला आडवूं शकेन ते मरण
मग कुठला तो शत्रु बापुडा कसला बलवान
सुखे घेतले तळहाती शिर निर्भय समरांगणी
जळल्या खाईत उडी घालती तेजस्वी त्या जनी" आ.पृ.७९, ८०

धोंडो केशव कर्वे विषयी कवी मंगलारती मध्ये सांगताना यातून वीररस उत्पन्न होतो.

"दृढ निश्चय करि तव परिस्थितीवर मात
जन जागृती म्हणजे मनामनाशी झुंज
झुंजावर वरी मति प्रसन्न तेजःपुंज" आ.पृ.८४

वीराचे वीर महावीर यांच्या कार्याविषयी कवी महावीर या कवितेते लिहतात -

"भवसागर हा पदी लोळतो छत्र नभाचे शिरी खडे
बुडणारांना हात् द्यावया पाय आमुचा सदा पुढे
तरतिल पुढती लोक जाण ते गीत स्मृतीचे गात कुणी
तेच वीर ते महावीर ते महातपस्वी सिध्द मुनी" आ.पृ.१०१

अशाप्रकारे पौराणिक, प्राचीन, अर्वाचीन मध्ययुगीन या सर्व वीरांचे वर्णन काव्यात केले आहे. या वर्णनातून वीररसाचा आविष्कार पहावयास मिळतो.

**क) वत्सलरस**

भारतभूमीला भारतमाता हे दुसरे नाव आहे. भारतीय हेच तिचे सुपुत्र आहेत. जेव्हा भारतमाता परदास्यात होती तेव्हा तिच्या सुपुत्रांनी तिच्या बेड्या काढल्या तिला स्वतंत्र केले हे माता -पुत्राचे नाते असल्याने राष्ट्रीय कवितेमध्ये या वत्सल रसाचाही अंतर्भाव होत आहे. गीतगुंजारव व आहुती या काव्यसंग्रहातील कवितांमध्ये वत्सलरस प्रकर्षाने दिसून येतो. तसेच वत्सल रसाच्या विविध छटाही पहावयास मिळतात.

स्वयंवर या काव्यात सद्यस्थिती दाखवत असता प्राचीनताही दाखविली आहे.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

व एक सल्लाही दिला आहे. भारतींच्या संस्कृतीचे इथ दर्शन मिळते.

"दुधतुपास्तव सत्वर आतां गोधन गोळा करू

मातेपासून तोड नका परि गाईचे वासरूं" गीत पृ.२६

'मुळशीचा पाळणा' या काव्यात वत्सलरस ओतप्रोत भरला आहे. त्याला करूणेची झालर आहे. आई गरीब असो वा श्रीमंत तिचे वात्सल्य हे श्रेष्ठच असते. सरकारच्या चुकीच्या निर्णयाने माता-बाळ एकमेकांपासून कायमचे दुरावतात. तरीही वात्सल्यभाव टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न माता करते.

स्तन बाळाच्या मुखात देते माता । पान्हा जरि फुटला नव्हता ।

कितिवेळ तरी मुखाकडे ती पाही । शेवटचे चुंबन घेई । आ.पृ.१४

'बाळ टिळक' या काव्यात बाबा - आई - बाळ असा संवाद घेतला आहे. या संवादातून वात्सल्य दिसून येते.

"सद्‌द कंठे परि उत्कंठ धरूनि बाळकास

पिता सांगतो आर्यभूमिचा सोपा इतिहास" गीत पृ.८६

'श्री सत्यविनायक' या पौराणिक कथाकाव्यात विनायक आपल्या मातेची आज्ञा पाळतो. जरी शंकराशी युध्द करण्याची वेळ आली तरी विनायकाच्या मृत्युने पार्वती शोक करते. पुन्हा जिवंत झाल्याने आनंदीत होतात. विनायक पित्याला म्हणतो -.

"माता माझी मी मातेच्या प्रितीचा बंदा

वचन तियेचे प्रतिपाळावे हा माझा धंदा

रडे अंबिका मांडीवरती घेऊनिया मूल

महादेवजी का कुस्करिले हे माझे फूल ?" आ.पृ.२०,२१

'भेटेन नऊ महिन्यांनी' या काव्यातही वत्सलरस स्पष्ट दिसून येतो पण या वात्सल्याला

करूण्याचीच झालर आहे.

“मनि धीर धरी शोक आवरी जननी । भेटेन नऊ महिन्यांनी
तुझ सोडुनि मी जाईन कागे इथुनि । परि देह परस्वाधीन
माऊली तुझा नव्हे मी कुमर । पुर्वीचा दावेदार
दे जन्म मला मातृभूमिचे पोटी । पुन्हा पुन्हा मरण्यासाठी
तव शुभ उदरी जन्म पुन्हा घेवोनी । भेटेन नऊ महिन्यांनी”

आ.पृ.२८, ३०

‘चिमणा शूर शिपाई’ या काव्यात चिमण्याचे आईकडून खूप लाड होतात. हा उदयाचा शूर शिपाई आहे म्हणून ,

“चिमणा शूर शिपाई, प्रितीने प्रतिपाळी आई
पुण्याईचे प्रेमलतेचे विमल सुमन साचे
मधुर सुधेसम निर्मळ गोरस आणि तुझा पान्हा
पिऊन जिवविल ज्योत जिवाची तान्हा गोजिरवाणा” गीत पृ. ४३

‘ओवाळणी’ या कवितेत चार वर्षाच्या चिमुकल्याने आईल ओवाळणी दिली. ती वात्सल्याचेच प्रतीक आहे. गोडपापा याचे मोल अमोलिक आहे.

“विचारांचे काहूर विरूनि गेले । हळुच बाळाने गाल पुढे केले
धरी हृदयी माऊली राजसाला । चुबंनाचे या मोल काय बोला ?”

‘शारदास्तवन’ या स्तवनात शारदाला मातेला चित्रीत केले आहे. ही माता प्रेरणादायी आहे.

“नमनाचे नजराणे घ्याया । आशिर्वाद द्याया ।
मन्मनमयुरा सनि विहराया । येथे सत्वर जननी ।”

आ.पृ.४७

श्रम करायला हवेत असा संदेश 'धन्य आजचे तरूण' या काव्यात दिला. हा श्रमधडा माताच शिकवित असते.

"जन्म मुलाचा धार दुधाची । परिमातेच्या स्तनी

श्रम कर्मचा धडा शिकविते ती जन्मापासुनी

मातृभूमिचे प्रेम उसळु द्या परिश्रमे या क्षणी" आ.पृ. ७१

हा श्रमधडा घेतला तर भारतमातेला आनंद होईल. कविकल्पना या काव्यात आई ज्याप्रमाणे या कुशीवरून त्या कुशीवर करते त्याप्रमाणे सुख दुःख ही आपली कुस बदलत असते.

"प्रतिमुळे जगि जन्म मृत्यु हा जन्माचा सोबती

जन्ममृत्युची जगज्जननीच्या कुशीत सुख संगती

"बाळ जन्मले जीव फुलले सवेचि पान्हा फुटे

जन्म सिध्द हा हक्क तियेच्या स्तनास्तनाला झटे" आ.पृ.९०, ९१

दुःखितांना विशेषतः स्त्रियांना आपले दुःख तुळशीजवळ मोकळे करता येते तीच मातेचा आधार देते 'तुलशी वृंदावन' या काव्यात ही मातृत्वाची वेगळी छटा पहा -

"तुळस गहिवरे गहिवरूनी हरी वृदांवनि ये त्वरे

प्रसन्न होऊनि अश्रु नेमिचे पुशिले पीतांबरे" आ.पृ.९९

मातृभूमीने स्वतंत्र झाल्यावर तिच्या पुत्रांना एक कानमंत्र दिला आहे. ते रामराज्य या काव्यामध्ये पुत्रांवरचा विश्वास दाखविला आहे.

"जन्मभूमि श्रीरामाची जाहली स्वतंत्र जन्मदात्रि निज पुत्राते देई कानमंत्र

नवीन भव्य संसाराचे रम्य राज्ययंत्र

नेऊ नको नरकी आता म्हणुनि शपथ घाली"

अशाप्रकारे वत्सलरसाचा परिपोष कुंजविहारींच्या राष्ट्रीय कवितेत झालेला आहे. मातेचे स्वरूप वेगळे आहे. बाळाची माता, धरणीमाता, तुळशीमाता, पार्वती माता, गोमाता अशा विविध माता चित्रित केल्या आहेत. परंतु या सर्वांच्यामध्ये आपल्या बाळासाठी प्रेमभावच आहे.

**ड) करूणरस -**

कुंजविहारींच्या काव्यात करूण रसाची झालर आहे. ही करूणता अध्यात्म क्षेत्रात वावरत असता-सुध्दा त्यांच्या कवितेत येते. अनेकांच्या व्यथा वेदनेमध्येही दिसते. सामाजिक क्षेत्रात वावरत असता वेदनेत दिसते. शेतकऱ्यांच्या दुःख वेदना चित्रित करताना दिसते. कधी सद्यस्थिती पाहून मन हेलावते व ही करूणता अनुभवास येते. या करूण भावामध्ये एक आर्त, खोल भाव आहे. तो भाव वाचक श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतो. त्यामुळे वाचकाला विचार करायला भाग पाडते. करूण रसाचे भाव सौंदर्य पुढील काही कवितातून अनुभवास येते.

अध्यात्म क्षेत्रात वावरत असता जर गुरू नसेल तर आणखीणच त्रास होतो व ईश्वरप्राप्ती लवकर न झाल्याने मन उदास बनते ती उदासिनता कारूण्य मनाला चटका लावते 'कधी रे भेटसी रामराया' या काव्यात हा भाव आला आहे. -

"गमे हे मला विश्व निस्सार आता
मनी बिंबले होसि तू विश्वकर्ता
तुझ्यावाचुनी वाटतो जीव वाया
कधी रे भेटसी रामराया
ढळावी जधी दग्ध होईल काया
कधी रे भेटसी रामराया" आ.पृ.१

भारतास या कवितेमध्ये भारताचे वैभव गेले म्हणून कवीला वाईट वाटत आहे.

"परि हाय । काळ तो गेला भू माय संकटी पडली
त्या वैभव शिखरावरूणी । दैवाने लोडनि दिधली
शौर्य, धैर्य, धन, विद्याही । प्रारब्धे नष्टचि झाली." आ.पृ.५

'हुरडा' कवितेतील करूणारस पुढीलप्रमाणे

"रानगावच्या राजावरती शस्त्राते चालविती
काळ्या शेतांतली कणसांची मान मोडतांना
दया धर्म कधि आठवतो का बैशरमी शूरांना
कुणी ओढती कुणी जाळिती, तुडवितिही केव्हा
बलहीनांच्या दैव असती कसे किती हाल" गीत पृ. ३०

'येऊ दे करूणा' या काव्यातील दुःखाला तर तोडच नाही हे दुःख जन्मभर पुरणारे आहे. शेतकऱ्याच्या करूण कहाणीचे चित्रण या काव्यात आले आहे. शेतातले पीक जाते. युध्दात मुलगा जातो. मुलगी व सून विधवा होतात. सावकार, अधिकारी जाच करतात

"शेतकरी लोक अजाण अति दीन, तयाला छळती सर्वजण
भांडवलवाला करी सावकारी तयाचा जन्माचा वैरी
देऊनी पाच दहा लिहूनी घेतो शेवटी दसपट धन नेतो
कधी कधि येती कोणी अधिकारी लांबविति कडबा आणि ज्वारी
वेठिला धरिती गाडी ही घरची जणू का मत्ता बापाची
संकटी रूतला शेतकरि अपुला जगाचा हा पालनवाला
प्रसंगी समजा बुडेल जरि शेती, खाल काय धोंडा आणि माती

दिसेना कोणी कोणी या समयी, आमुची रक्षिल भूमाई" गीत पृ. ३३

'संध्या' या कवितेत परदास्यातील भारभूमीला कुणी सोडवील असे नाही. प्रत्यक्ष नारायणालाही याचा विसर पडला.

"हा नारायण निज लीलेने विश्व रची सारे
आर्य भूमिची तुला दयाळा कीव येऊ दे रे ।
हीन दीन आर्यभू तियेला रक्षिल रे,
कोण आर्यभूमितुन गोधन जाते बघ होतो हात" गीत पृ. ५

'मुळशीचा पाळणा' ही आणखी एक कविता करूण रसाचा परमोच्च बिंदू आहे. बाळाच्या रक्षणा करित । आईला दूध सुध्दा पाजता येत नाही. की टाळूला तेल मिळत नाही. ही दशा धरणामुळे आली मातेवरचे अत्याचार, घरधन्याचा मृत्यू, निर्धनता या सर्वातून कारूण्य दिसते.

"नऊ दिवसांचा ताप अंगि फणफणतो । उठताना झोका जातो
मम जीवाचे जिवलग नुरले कोणी । करतील औषधपाणी
शमवाया चिमणी भूक । हे बोट मधाचे चोख
हृदयाची झाली राख म्हणुनीच सख्या । पान्हा पुटला नाही." आ.पृ.१४

'बार्शीच्या भगवंतास' या काव्यात कवी भगवंताला विनवतो की परवशता नष्ट व्हावी.

"यादवराया तुला आमुची येईल कधि माया
अंत किती पाहतोसि निर्दया धाव पावरे सखया
अन्नाविण उपावासी उघडे वस्त्राविन अंग" आ.पृ.१७

मातेची करूणता 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेमध्ये दिसून येते ,

"किती दुर्दैवी प्राणी असतिल असले । जे अपराधाविन मेले मेले

लाडका बाळ एकुलता

पांशीची शिक्षा होता

कवटळूनि त्याला माता

अति आक्रोशे रडते केविलवाणी । भेटेन नऊ महिन्यांनी"        आ.पृ.२८

'तरूण भारतास' या काव्यात नव तरूणांना सद्यस्थितीचे विदारक चित्रण दाखवून दिले आहे.

"भारत बंदीवान तयाला विश्व हांसते उपहासे

दीन धेनुपरि आर्य माऊली पहा फोडिते हंबरडे

अंतरले गोपाल - बाळ तिज कसाई भासति चंहुकडे

शब्द सुखाचा श्रवणी न पडे जगी होत निज बदनामी

कार्यपराड्.मुख बनुनि तियेचा गळा कापिला तुम्ही आम्ही"        आ.पृ.२२

'सावित्रीगीत' या काव्यातही थोडी कारूण्याची झालर आली आहे. सतीला राजकुमार असून सौख्य लाभत नाही. अशात उपवास सत्यवानाचा मृत्यू यामुळे ती म्हणते.

"पतिनिधनाची न्ये कल्पना मायमाऊलीविना

मम हृदयावर विरह निखार ठेउ नको सज्जना"'        आ.पृ.३७

गुलामीमुळे भारतीयांना हीन दैन्य अवस्था आली 'अर्जी' या कवितेत ही दिसते.

"घरकू किराया व बाहर मजूर । पै पै को कहते हम जी हुजूर

मगर हिर्स्समारी उठाते सितम । खोते है इज्जतकू रोते है हम

धोकर खडा हु मै आँसूसे हात । निकलती है जलके कलीजेसे बात."

आ.पृ.११८

'तुळशीवृंदावन' या कवितेतही करूणा ओतप्रोत भरली आहे. या कथाकाव्यातील स्त्रीचे दुःख विदारक आहे.

"नवी नोवरी होऊनि आले अशाच एका दिनी
देव कोपला धर्म संकटी सोडुनि गेले धनी
वैभव गेले वंश वेलही सुकली मुकली सवे
उरले घर घरनीण उरली उरली ही आसवे
कां भरले घर स्मशान झाले जळते मेल्याविना" आ.पृ.९८

'दावी रूप डोळा, पांडुरंगा' या काव्यात सद्यपरिस्थितीने झालेली ससेहोलपट दुःख दैन्याने झालेली जीवाची ओढाताण चित्रित केली आहे.

"येऊ दे दयाळा, दीनाचा कळवळा
दांविरूप डोळा, पांडुरंगा
आयुष्याचे कोडे सोडविल कोण
सांग तुझ्याविण पांडुरंगा" गी. पृ.१८

वरील कवितेतून कारूण्याभाव चित्रित केला आहे. कारूण्य एवढे क्लेषदायक होते की त्यामुळे मन कुंठित होते.

**इ) शांतरस -**

जे संवेदनशील मन असते त्यालाचा ईश्वराचे अस्तित्व कळत असते. व तो ईश्वराच्या अस्तित्वाचा तत्त्वांचा शिकवणुकीचा अर्थ शोधत असतो. अर्थ शोधत असताना त्याच्यात व ईश्वरात जास्त अंतर राहत नाही. तो ईश्वराच्या भक्तीत लीन होतो. ही भक्ती त्याच्या अभिव्यक्तीतही येते. येथे कुंजविहारींनीही काही आध्यात्मिक भक्तिपर कविता लिहल्या आहेत. त्या काव्यातून शुध्द भक्तिभाव प्रकट होताना दिसतो. तो काव्यातला भक्तिभाव खालील प्रमाणे,

'कधी रे भेटसी रामराया' या काव्यात कुंजविहारी श्रीरामाच्या भक्तीत लीन झाले आहेत. श्रीरामाला कवी मागतात -

''असो मानसी आस सत्संगतीची
मती ना मळो दृष्ट संगी रमाया
भवाब्धीतुनी शक्ति देई तराया
बहु साजिरी गोजिरी मुर्ती रामा
वसो अंतरी नित्य आनंद धामा''　　　　आ.पृ.१

'गोंधळ' या कवितेतही अंबिके बद्दलचा भक्तिभाव व्यक्त झाला आहे.

''कुंजविहारी विनवि अंबिके अन्य आसनाही
महाराष्ट्राचा मान वाढवी भारतमाये
शिवाभवानी वैभवशालीनी गोंधळास ये ये''　　आ.पृ.८

'माझे ध्येय' या काव्यातही कृष्ण कुंजविहारी हा भक्तिभाव दिसतो आहे.

''याजनी जनार्दन भरला । श्रीकृष्ण सखा भगवान
ना दिसे कळेना कांही । परिहृदया पटली खूण
प्रेमाने पुजूनि त्याला । पदी देहसुमन वाहीन
हा स्वार्थधूप जाळून । ओवाळुनी पंचप्राण''　　　आ.पृ.३.

'बार्शीच्या भगवंतास' यामध्ये भगवंत व कवि यांच्यातील भक्तिभावही दिसून येतो,

''तारी दिननाथा संकट वारी भगवंता
भेटशील तू जिवलग जीवा म्हणूनी धावोनी
आलो येथे दीनदयाळा दिन रात्रीचा करून
चतुर्भूज सावळे रूप हे सिंहासनि दिसले
मन मावळले नेत्र निमाले हृदय बोल हे बोले''　　　आ.पृ.१७

'सावित्रीगीत' या काव्यात सावित्री व तिची पतिनिष्ठा व्यक्त केली आहे. पतीनिष्ठा एवढी की विधीलिखितही तिने बदलले आहे. अशीच निष्ठा भक्तीच्या मार्गात असायला

हवी.

“आशीर्वचने आश्वासोनी धर्मराज परतला

सतिकरस्पर्शे सत्यवाननृप सजीव जगी जाहला

कुंजविहारी गात भक्तिने मंगल सतिसंस्कृती” आ.पृ.३७

‘सिध्द सिंहासन’ या काव्यात सोलापूरचे दैवत सिध्देश्वर या दैवताविषयीची कवीची भक्ती दिसून येते.

“पिसाट वारा ऊन भयानक धूलीकण अंबरी

परी सरोवर दर्शन होता कष्ट न उरती उरी

मंत्र मनोहर मुर्ती मनोहर प्रसन्न जीवनकला

श्रवणी नयनी मनि मोहरवी आनंदाचा मळा

आत्मनाद या प्राणातंतुवरि झणत्कारूनी मुदे” आ.पृ.६९

‘विठ्ठलास’ या कवितेमध्ये पुंडलिक विठ्ठल व भक्त यांच्या तिहेरी धागा आहे.

“चिरंजीव ते कुटुंबवत्सल पुंडलिकाचे प्रेम कुठे

बघुनि मृत्तिका कणकणांतुनि धन्य धन्य हा ध्वनी उठे

प्रिती भक्तिमध्ये आंधळी दोष तिला ना दोष तुझ्या या देवगुणा”

आ.पृ.९२, ९३

‘कबीर वचने’ या वचनात सगळीकडे भक्तिभाव दिसतो शुध्द मनाने भक्ती करा. देव सर्वव्याप्त आहे. तो भ्रांतीमुळे दिसत नाही. ज्याच्याकडे भक्ती आहे तोच ईश्वराला ओळखू शकतो.

“म्हणोत हे खोटे जन अविश्वासी । देव भाविकासी नित्य भेटे ।

भासविना सृष्टी तया दुजेपण । भक्तिभाव धन्य एकविध

देव नसे दूर वसे अंतरंगी । तिथे लागवेगी घेई धाव ।

असोनी दिसेना कवि हा अनंता पापाचे पर्वत आड उभे

पुणाईचे फळ पावेन मी जेव्हा । प्रभु भेटे तेव्हा याच देही"

आ.पृ.९५,९६,९७

'महावीर' या भक्तीकाव्यात वीरांचे महावीर आहेत अशा व्यक्तींना नमो चा मंत्र आवडतो. असे लोक महातपस्वी असतात. आत्मस्मृतीने जीवनाचे सार्थक घडते

"आत्मशक्ति ती धर्मनी ति ती तीच संस्कृती ज्ञानकळा

नमो हा मंत्र सिध्दिचा जन्मापासूनि रूचे मला" आ.पृ.१०१

'कहत कबीरा' या अनुवादित दोह्यामध्ये / वचनामध्ये कबीर म्हणतात - देव भक्तामध्ये जात नसते तिथे भेदभाव नष्ट होतो. ईश्वरासाठी कृत्य अनुभव पाहिजे व निष्काम कर्म केले पाहिजे. निर्गुणाशी एकरूप होता आले पाहिजे.

"देवभक्त दोन्ही एक । दोन हात एक टाळी

जागवोनी भक्तिभाव । भेदबुध्दी खांडोळिली

अनुभवा वाचुनिया । समाधान कोठे नाही

गुण लोपता निर्गुणी । जीवनाथ लाभ मोठा" आ.पृ.१०४, १०५, १०६

'भावसुमनांजली' ईश्वरचरणी लीन झाल्याने ईश्वर प्राप्त झाला. तिथेच आत्मसुख प्राप्त होते. दिव्य आनंद प्राप्त करण्यासाठीच ईश्वराकडे जीवन अर्पित केले त्याचा विरह भक्ताला सहन होतें नाही.

"कुणाचे न काही घेता तया अर्पिशी सर्वस्व

अनुपम दातृत्व हे भला भोळा दिसतोस

देशी गुंगीचे औषध हिरावून घेशी बुध्दी

म्हण याला वेडे गाणे म्हण सुक्त आनंदाचे

सर्व काही तुझ्या हाती समर्पण करायचे" आ.पृ.११३, ११४, ११६, ११७

कुंजविहारी पूर्णपणे भक्तिरसामध्ये बुडून गेलेले दिसतात त्यांच्या भक्ती काव्यामध्ये त्यांची भक्ती अंबिका, श्रीराम, विठ्ठल, सिध्देश्वर, महावीर, कबीर, श्रीकृष्ण यांच्यावर असलेली दिसून येते. सर्वरूप एकच आहे हेही जाणवत. आत्मानुभव येतो. भक्तिरसाचा अनुभव स्वतः घेवून इतरांनाही देतात.

अशाप्रकारे कुंजेविहारींच्या काव्यसंग्रहात भक्तिरस, व्यापकतेने आला आहे. या भक्तीरसामध्ये स्वातंत्र्यभक्ती, राष्ट्रभक्ती आली आहे. वीररसही आला आहे. वत्सल रसानेही स्थान प्राप्त केले आहे. करुणरसाने मनाला चटका लावला आहे तर भक्तीरसाने मनाला शांत करून मुक्ती मार्गाची वाट दाखविली आहे, ती शांतरसाने.

**३) गेयता व नादमाधुर्य**

शाहीर कुंजविहारी यांच्या कविता लोकांच्या मनापर्यंत जावून पोहचल्या होत्या. या यशाचे गमक होते त्यांच्या कवितेची गेयता व नादमाधुर्यता. कुंजविहारींनी अनेक कवितांना चाली लावल्या व त्या स्वतः गाऊन लोकासमोर सादर केल्या. कवितेच्या शब्दामध्येच एक नाद आहे, लय आहे. त्यामुळे त्या सहज गायला सोप्या पडतात. कुंजविहारींनी अनेक काव्यप्रकार हातळले. आशयाने, विषयाने व अर्थाने कविता रचल्या व वेगवेगळ्या चाली दिल्या. त्या कविता पुढीलप्रमाणे पाहुया.

'येऊ दे करूणा', ही कविता 'अधरी धरि मुरली' या चालीवर म्हटली जात त्यामुळे ती परिणामकारक ठरते. 'माझे ध्येय' ही कविता 'उद्‌धवा शांतवन कर जा' या चालीवर म्हणत. स्वयंसेवकाचे गीत होते त्यामुळे तर या गीताला आणखी उठावदारपणा आला व ते त्या काळात लोकप्रिय झाले. ही कविता गेयता व माधुर्याने म्हणून सरस आहे. स्वयंवर ही कविता मधूर भूपाळीच्या चालीवर आहे. घनःश्याम सुंदरा या भूपाळीची चाल आहे त्यामुळे अगोदरच पौराणिक असलेली कथा अधिक सुगम व सरस बनते. 'सोलापूर वर्णन' मध्ये सोलापूरचे वर्णन बहारदार केले ते

फटक्याच्या चालीमुळे याला बिकट वाट या फटक्याची चाल आहे. 'शारदास्तवन' या स्तवनाला देखील समकालीन पदाची या नवनवलोत्सवाची चाल दिली. त्यामुळे हे स्तवन हृदयापर्यंत भिडते. मुजरा ही कविता राजकीय स्वगत पद्य आहे व या पदाला 'जय जगदाधारा प्रभुवरा' या नाट्यपदाची चाल दिली त्यामुळे हा मुजरा विधात्यापर्यंत पोहचला लोकांना रूचला. 'आजकाल चे हितगुज' हे राष्ट्रीय सभेला अधिकारभोग प्राप्त झाला या ऐतिहासिक क्षणास अनुलक्षून हे काव्य लिहले आणि याला चाल 'भैरवीमध्ये' दिली त्यामुळे या कवितेची आशावादी भूमिका लोकांपर्यंत पोहचली. शब्दाचे सामर्थ्याचे महत्त्वही कळाले. अशाप्रकारे या गीतांना स्वातंत्र्यपूर्व गीतांना चाली दिल्याने त्या मधूर व गेय बनल्या आहेत.

कुंजविहीरींच्या काव्यावर संतवाड्.मयाचा परिणाम झाला. संताप्रमाणे विराणीही लिहली आहे 'कधी रे भेटसी रामराया' व 'बार्शीच्या भगवंतास' या दोन विराण्या सुगम बनल्या आहेत. विरण्यातील भाव हृदयापर्यंत भिडतो.

कुंजविहारींच्या गेय व माधूर्याने युक्त कविता सरस बनल्या आहेत. त्या आजही अनेकांच्या ओठावर येत आहेत. त्या कविता पुढिल प्रमाणे - 'तरूण भारतास', 'भेटेन नऊ महिन्यांनी', 'मराठा गडी यशाचा धनी', 'तयाला तुरूंग भिववीर किती ?' 'नव्या जगाच्या निर्मात्यांनो,' 'चिरंजीव होवो जगी लोकशाही,' 'धन्य आजचे तरूण,' 'देवदयेचे नजराणे,' 'उद्याचा देव असावा कसा,' 'रामराज्य,' सैन्य चालले पुढे पुढे,

या व्यतिरिक्त भाव गेय व माधुर्य यामुळेही काही कविता स्मरणात राहतात. त्या पुढील प्रमाणे - भारतास, संध्या, शहराचे सुख, ओवाळणी, होळी, विठ्ठलास, कबीर वचने, भावन सुमनांजली, तुळशी वृंदावन.

या बरोबरच आणखी काही कविता गेयतेने व माधुर्याने सरस ठरल्या आहेत.

त्या पुढील प्रमाणे - रत्नागिरी परिषद, रणांगण ग्रंथ इथे संपला, निसर्ग गीता, टाक पुढे पाऊल, स्वराज्य नारायण, राजधानी

अशाप्रकारे जवळजवळ सर्व कविता गेयतेमुळे नादमाधुर्याने युक्त आहेत. असे असणे साहजिक आहे. कुंजविहारींचे काव्यच मुळी लिहून त्या जनसमुदायासमोर म्हणून दाखविण्यासाठी अवतल्या होत्या. लोकांना त्या सहज आठवणीत ठेवता येऊन राष्ट्रकार्याला हातभार लाभावा हा मूळ हेतू होता. या काव्यसंग्रहात त्याचा हेतू सफल झाल्याचे दिसते. कारण त्यांच्या कविता भारतीयांच्या स्मरणात राहिल्या आहेत. उदाहरणार्थ - भेटेन नऊ महिन्यांनी सारखी कविता किंवा मराठा गडी यशाचा धनी या सदरातील कविता.

अशा प्रकारे कुंजविहारींच्या कविता गेयतेने व माधुर्याने परिपूर्ण आहेत.

**४) शब्दकळा -**

**अ) साधी, सोपी, ओघवती भाषा -**

कुंजविहारींची भाषा साधी भोळी असून तिच्यात खेडवळ निरागसपणा दिसतो. तिच्यात अलंकार नाहीत. शृगांर नाही, गुढतेचे धुके नाही, सामान्य वाचकांच्या डोळ्यावरून जाणारे शब्द अथवा कल्पना नाहीत. आधुनिक कवींच्या प्रमाणे शहरात कोचावर बसून लिहलेल्या क्रांतीच्या अथवा देशप्रेमाच्या नाटकी घोषणा नाहीत. सवंग लोकप्रियतेची हाव नाही वा आत्मगौरव नाही. त्यांचे काव्य मोबदल्यासाठी लिहलेले काव्य नव्हे. भावानुकूल असून त्यात हृदय हालवून सोडणारा करूणरस आढळतो त्यात कुणाचा द्वेष नसून ती सत्प्रवृत्तीची, सात्विक रसाची प्रसादपूर्ण मंदाकिनी आहे. कुंजविहारी हे नुसते पांढरेपेशांचे कवी नसून खरेखुरे सामान्य जनतेचे कवी आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे.

'कधीरे भेटशी रामराया' ही त्यांची पहिलीच कविता पण तिच्यात कुठेही

क्लीष्टता नाही. मोजक्या शब्दात आध्यामातल्या वरच्या पायरीवरची अनूभूती व्यक्त केली आहे.

“दिला त्वा मला जन्म हा मानवाचा ।

तशी ही दिली दिव्य धी आणि वाचा ।।” आ.पृ.१

प्रभोभक्ती दे त्वद्गुणाते वदाया । कधीरे अता भेटशी रामराया ।

घडावी करी कांहि सेवा जनाची । असो मानसी आस सत्संगाची

‘नोकरशाहीची आरती’ या काव्यात समाजाचे एकूणच परिस्थितीचे आकलन करून मोजक्या शब्दात मांडले आहे.

“नोकरि द्या नोकरि द्या म्हणती शिकलेले

विद्येचे वाटोळे नोकरिने केले

दुष्काळात जर्जर शेतकरी बनले

कंठि अर्ध उपाशी जीवित उरलेले ।। जय देवी ।” आ.पृ.९

‘मुळशीचा पाळणा’ या काव्यातील करूणा सद्य परिस्थिती सरळ साध्या स्वरूपात लिहली आहे.

“काळाची विपरित करणी । सर्कशीत सिंह धरूनी ।

बकरीसह पाजिती पाणी । या दैवाचा ठाव कळला काही ।

शमवाया चिमणी भूक । हे बोट मधाचे चोख

ह्दयाची झाली राख । म्हणूनीच सख्या पान्हा फुटला नाही.” आ.पृ.१४

‘गडे मज संगे घेऊनी चला’ हे शृंगारिक काव्य परंतु ओघवत्या भाषेतून वीरांगणाचे मार्मिक संवाद काव्याला पुढे घेऊन जाते व वरच्या स्थानावर नेवून ठेवते.

“असे सक्त ताकीद धन्याची गुन्हेगार होईन

भिऊ नका पुरूषवेष घेईन

नव्हे समर तव विलासमंदिर भरेल धडकी उरी

वाढले पडले शूराघरी''　　　　　गीत पृ.४५

लढूनि रणागणी विजय मिळवुनि, सुखाविन दोन्ही कुला 'नाटक सिनेमा महात्म' या काव्यात टीकेचे महत्व किती मोजक्या सरळ भाषेत सांगितलेले ते पहा -

''नाटकी भावपूर्ण ध्येयदर्शन । असावे देशकालवर्तमान

चिरस्थायी पौराणप्रसंग कल्पून । चलचित्र योजना असावी

समाजटिका अवश्य कीजे । परी सुधारणेचा मार्ग दाविजे

साधु संतानी केली टीका । परी पंथ दावित सोज्वळा निका

याचि परीचा मार्ग देखा । टीकाकार स्वीकारी

टीका असावी विधायक । टीका व्हावी फलदायक

परिणाम होती अनर्थकारक । टीका नोहे विषवल्ली''　　　　　गीत पृ.४२

गीतेचे अर्थ किती सरळ सांगितला ते 'ज्ञानेश्वरीची आरती' मध्ये पहा -

''अस्तित्वेविण जगणे मरूनीही उरणे

नित्य नवेपण धरणे अनित्य जग गणणे

आत्मानंदे डुलणे स्वधर्म अनुसरणे

ब्रह्मचि आपण बनंने गीतेचे गाणे''　　　　　गीत पृ.१४

'ओवाळणी' ही कविता सहज भाषेत परंतू परिणामकारक अर्थ देणारी आहे.

''मला आई बोलली बाळमूर्ती

तया ओवाळुनि जननि वदे बोल

अता ओवाळणि काय घालशील ?

बाळ भांबावुनि बघत भोवताली

दूर जिवलग जाहले अशा वेळी

विचारांचे काहूर विरूनि गेले

हळुच बाळाने गाल पुढे केले

धरी हृदयी माऊली राजसाला

चुंबनाचे या मोल काय बोला ?" आ.पृ.४१

'नव तरूणास' या काव्यातही कवीने अवघड तत्व सोप्या, मोजक्या शब्दात सांगितले आहे.

"नका विषाची पाहु परिक्षा दुर्बलतेची व्यथा ।

सदाशिवाला विष ना बाधले बलवंताची कथा

स्वजनहितास्तव सध्दमार्गास्तव सत्कर्मास्तव जिणे

दीन दुर्बलासाठी जीवित वित्तही ते वेचणे." आ.पृ.८६, ८७

'सैन्य चालले पुढे' या काव्यात काव्याची भूमिका स्पष्ट केली आहे. ती साध्या शब्दात -

"अध्यात्माचा दंड तयावर तलवारीचे तेज चढे

धर्म अहिंसा व्रत सत्याग्रह सैन्य चालले पुढे पुढे" आ.पृ.८८

'कविकल्पना' या काव्यात काव्य जगातल्या अलौकिकतेला सोप्या कल्पनेत स्पष्ट केले आहे. -

"प्रीति फुलेना कधि संसारी दुःख साहिल्याविना

मनामनांवर राज्य करी जगि रवींद्र कविकल्पना" आ.पृ.८९

अशाप्रकारे सोपी ओघवती भाषा दिसून येते.

**ब) भावानुरूप भाषा -**

कुंजविहारींच्या जीवनातला एक विशेष आहे आणि तो म्हणजे भावानुकुल वृत्ति, सात्त्विकता व खेडवळ निरागसपणाही त्यांच्यात आहे. छान छोकीने नटलेली

विद्याविभूषणांनी न सजलेली पण मोकळया मनाची उदार हृदयाची, स्पष्ट बोलणारी आणि साध्या भावनांनी थबथबलेली थोर मराठमोळी माणसे, जशी असतात तसे कुंजविहारी आहेत. शहरांतले उसने वैभव, नागर संस्कृतीतील चांगल्या कल्पनांचे विडंबन कृतिशून्य सहानुभूतीच्या गप्पा, लोकशाही तत्वावर निवडून आलेल्या नगरपित्यांच्या गंमती या साऱ्या गोष्टीची कुंजविहारींना सखेद मौज वाटते.

त्यांच्या काव्यात अनेक वीर, वत्सल, करून भक्ती, शृंगार आदी भावना आहेत पण त्या त्या अनुषंगाने येतात त्यामुळे त्या अधिक परिणामकारक ठरतात वाचकाच्या श्रोत्याच्या मनाचा ठाव घेतात.

'हुरडा' या काव्यामध्ये त्वेषाचा, रागाचा भाव आहे. परंतु त्याला सौम्य पातळीवर आणले व कवितेला एका संयत पातळीवर आणून सोडले.

"किती जन्माचा, कुणास ठावा साधुन घेती दावा
बलहीनांच्या दैवी असती, कसे किती हाल
सहानुभूती शब्दी कृति नच खोड जडलि जगता
कुंजविहारी गात गीत हे हुरडा खाता खाता" गीत पृ.३०

'येवू दे करुणा' या मध्ये करूणेचाच भाव पूर्ण कवितेत दिसून येतो.

"येऊ दे करूणा करूणा गोविंदा बुडाला शेतकिचा धंदा
कोपली धरणी ही धरणी माता श्रीहरी सख्या जगन्नाथा
एक ना दोन सांगू किती हाल, बाप हो दाद कधी द्याल
संकटी रूतला शेतकरि अपुली, जगाचा हा पालनहार" गीत पृ.३१,३३

'शहराचे सुख' या कवितेत शहर सुधारले म्हणतात म्हणून खेडूत शहरात येतो पण त्याची निराशा होते शेवटी तो खेड्याकडे जातो -

"लोक शहराचे जिते बोलते यंत्रापरि बनुण

जाणुनि बुजुनी होऊनि बसती पहा पराधीन" गीत पृ.३४

'बार्शीच्या भगवंतास' या काव्यात भगवंत व कवी यांचे सख्य जमले आहे. त्या जवळीकतेच्या पातळीवर कवी ईश्वराला म्हणतात -

"श्रीमंतीचे सोंग तुला रे कसे आठवे सांग ?
तु काळा मी काळा काळी आर्यभूमि माझी
काळ्याचा कैवार घ्यावया होशिन कां राजी" आ.पृ.१७

वीरत्व, वात्सल्य, करूण, स्फूर्ती, प्रेरणेचे सुंदर मिश्रण असलेले काव्य म्हणजे 'भेटेन नऊ महिन्यांनी' हे काव्य आहे.

"लाडका बाळ एकुलता । फाशीची शिक्षा देता
कवटाळुनि त्याला माता । अति अक्रोशे रडत केविलवाणी ।
मजसाठी तिने सिंहासन निर्मियले । त्या एका खांबावरले
मी वीर गडी चढेन गे त्यावरती । इतरांची नाही छाती
लाभेल मुक्ति जिवास । वर जाईन मी लाथ जगा हानोनी
स्वातंत्र्यरणी लढण्याला । तव शुभ उदरी जन्म पुन्हा घेवोनी"

आ.पृ.२८,२९,३०

'पंढरीच्या पांडुरंगास' या काव्यात आध्यात्मातील अवघड कोडे सांगितले आहे.

"विश्व म्हणजे हे गणित निर्गुणाचे
गोड कोडे अती अमित आराचे
स्व भावाने भागिले निर्गुणाला
ऐक्य प्रचिती आनंद दे मनाला" आ.पृ.३३

'चिमणा शूर शिपाई' काव्यात मातेची भावानुरूप भाषा आली आहे. तसेच आईचे चिमण्या भवितव्याविषयी असणारी भावना रेखाटली आहे.

''जणू उद्याचा विजयश्रीची ही चिमणी मुर्ती

समर्थ, तुकया, टिळक, शिवाजी होईल कोणी पुढती' गीत पृ.४३

'सावित्रीगीत' या काव्यात कुंजविहारींनी स्त्री सुलभ भावना व्यक्त केली ही आहे. पतिनिष्ठ भावना व्यक्त केली आहे -

''तव वचने सौभाग्य वर्षभर लाभत मज निश्चये

अताच मंगल म्हणा पुनरपी मुहुर्त असला न ये''

''पतिनिधनाची न ये कल्पना मायमाऊलीविना

मम हृदयावर विरह निखारा ठेऊ नको सज्जना'' आ.पृ.३६,३७

अशाप्रकारे कुंजविहारींनी कवितेची भावानुरूप भाषा वापरली आहे त्यामुळे कवितेतील भाव लोकांच्या मनापर्यंत जावून पोहचला आहे. ही भाषाशैली कुंजविहारींची एक खास शैली बनली आहे.

**क) संस्कृत व उर्दू शब्दप्रयोग -**

कुंजविहारींना अनेक भाषांचे ज्ञान होते. 'गीतंगुजारव' व 'आहुती' या काव्यसंग्रहातही त्याचा अनुभव येतो. संस्कृत भाषेचा त्यांच्या साहित्यावर बराच परिणाम झाल्याचे दिसून येते सुभाषिते, शब्द, शैली, याचा या काव्यसंग्रहावर परिणाम झाल्याचे दिसून येते संस्कृत काव्याचे मोठे वैशिष्ट्ये 'सुभाषित' आहे. हे वैशिष्ट्य दुसऱ्या कोणाच्या काव्यात नसेल, इतके कुंजविहारींच्या काव्यात आढळते. तसेच कुंजविहारी 'गझनफर'ऱ्या उर्दू साप्ताहिकामध्येही लिखाण पाठवित. त्या साप्ताहिकातील 'अर्जी' ही कुंजविहारीची कविता 'आहुती' या काव्यसंग्रहात आली आहे. आणखी उर्दु शब्द इतरत्र काव्यसंग्रहात आले आहेत.

**संस्कृत शब्द, सुभाषिते -**

१) माझे ध्येय -

“संकटे ग्रासिले तिजला । परि मानसि भ्याली नाही
विश्वास प्रभुपदी धरूनी । प्रसवली पुत्र भुमाई” आ.पृ.२

२) स्वयंवर -

“स्वार्थासाठी सखा सहोदर बळी देत भागिनिला
स्वतंत्रता - रूक्मिणी हरण करि आर्य - घनसावळा” गीत पृ.२५

३) श्री सत्यविनायक -

“कपटपटुंच्या मधुर वाणिमधि जलाल विष असते
मृत्युला प्रिय मित्र मानतो शूराचा बच्चा
अपेशांतही अनुपम यश कधि अवचित सांपडते” आ.पृ.२०

४) सवाल

“विनाशकाली विपरित बुध्दी सुचते म्हणती सुज्ञ मन’ आ.पृ.१६

५) नाटकसिनेमा महात्म्य -

“जय काव्यदेवी कुलकलंका । जय द्रव्यभक्षक पावका ।
आयुरारोग्य अपहारका । व्यसनसम्राट नाम तुझे” गीत पृ.४१

६) चिमणा शूर शिपाई -

“नीतिनिपुण मन पवित्र वर्तन वागिव जगि अपुले
अनुकरणाला उपदेशाहुनि उदाहरण चांगले” गीत पृ.४३

७) श्री शिवरायाची आरती

“परकी पिंशाच्चबाधा देशाला छळिते
दास्य श्रृंखला बंधन भ्रमावित बुध्दीते

जीवितपात्री वित्तपात्रि विषारी कुतर्क कालविते
हा पंचाक्षेरी भय हरि स्वतंत्रतामंत्रे'' गीत पृ.७६

८) शारदास्तवन

''जय जय सगुण संजीवनी । देवी ब्रम्हसुता ।
आनंद योगिनी । त्रिभुवन हृदयाल्हादिनि'' आ.पृ.४७

९) सुराज्य झाल्याविना -

''सुविचारांचे सुवर्ण बनते जळत्या अग्नीमधी
मर चुकेना परि मरणाचे कारण होऊ नका'' आ.पृ.६१

**उर्दू शब्द -**

| **कविता** | | **शब्द** |
|---|---|---|
| १) भारतास | - | नौबत |
| २) सवाल | - | बहु बेजार |
| ३) तरूण भारतास | - | करारनामा, दिलप्यारा |
| ४) भेटेन नऊ महिन्यांनी | - | शरमिंदे, तैनात, ताजीम |
| ५) सुदिन | - | समशेर, गनिम |
| ६) धरी हृदयी अग्नी ज्वाले | - | मर्दानी |
| ७) अर्जी | - | पूर्ण कविताच उर्दूमध्ये आहे.ही कविता 'गझनफर' या उर्दू साप्ताहिकामध्ये पहिल्याच अंकामध्ये छापून आली होती. |

अशाप्रकारे कुंजविहारींच्या काव्यात संस्कृत आणि उर्दू शब्द पहावयास मिळतात.

**ड) संबोधनात्मक व अवाहनात्मक शब्दप्रयोग -**

राष्ट्रीय कवितेमध्ये लोकांच्या मनात राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठी

प्रचार व प्रसार ओघाने येतो. त्यामुळे राष्ट्रीय काव्यात प्रचारकी थाट येतो. कधी कधी हे जनमुदायासमोर गाऊन दाखवावे लागते. सहाजिकच काव्यात संबोधनात्मक व अवाहनात्मक शब्दप्रयोग येतात. असे असुनही कुंजविहारींच्या काव्यात कुढेही प्रचाराचा अतिरेकीपणा येत नाही. जेव्हा ऐतिहासिक किंवा भविष्यकाळात कवी रमतो तेव्हाही तो आत्यंतिक ध्येयवादाने झुलत नाही. द्रष्टेपणाचा आव तो आणत नाही. सामान्य सत्प्रवृत्त माणसाच्या भूमिकेवरूनच तो पाहतो. या सत्प्रवृत्तीमुळे त्याच्या काव्यात एक अपूर्व मांगल्य व संयम हे गुण निर्माण झाले आहेत. कवी कुंजविहारी अत्यंत विनम्र वृत्तीचे आहेत. नव्या युगाच्या प्रवर्तकत्त्वाची धुरा त्यांवर आहे. असे ते उदघोषून सांगत नाहीत. नव युगनिर्मितीला त्यांनी मदत केली आहे हे कुणीही मान्य करील. पण त्याचा त्यांना अभिमान नाही. गर्व तर नाहीच नाही. इतरांच्या तुतारी, डंका, दरारा, अशा काव्यात व्यक्त झालेल्या भावनांचा मागमूस देखील प्रस्तुत कवीत नाही. या कवीने मेळ्याच्या निमित्तोने, परिवदांच्या प्रसंगाने आणि प्रचाराच्या हेतूने कविता सहज केल्या असतील. पण कवी म्हणतात - मी राजकारणात दवंडीवाला आहे. सभा सुरू करण्यासाठी चार लोक जमा करण्याचे काम मला सांगितले आहे ईश्वराने तोतरेपणाने गद्य बोलायला जड जाते म्हणून पद्यात सांगू लागलो इतकेच् सभापतीचे, सभासदांचे आगमन होईतो मी गाईन. राष्ट्रप्रमुखाचे अवाहन करीन. त्यांचे संदेश लोकांना सांगेन लोक मला विसरतील. विसरोत बापडे. अशा अनेक कुंजविहारीचे अनेक जन्म या विराट राष्ट्रपुरूषावरून ओवाळून टाकले पाहिजेत.''[३] तरीही त्यांच्या काव्यात संबोधन व अवाह्न काव्यात दिसते ते खालील प्रमाणे -

'गोंधळ' या कवितेत अंबेला अवाहन केले आहे. गोंधळला बोलावले आहे व संबोधनही केले आहे. -

''कसा पाहसी गोंधळ असता उघड्या डोळ्यांनी

हक्काची मागणी पुरवि ही दान नको देऊ

हिमतीने गतवैभव अमुचे परत आम्ही मिळवू"          आ.पृ.८

'भारतास' या कवितेत नरवीर भारत बाळाला आवाहन केले आहे.-

"पा रडव्या रणगीतानी कार्यभाग नाही होत

तू नरवीरांचा छावा

का तुला असा भ्रम व्हावा

दावुनी पराक्रम् बरवा"          आ.पृ.५

'संध्या' कवितेत सूर्याला संबोधून भारतीयांना अवाहन केले आहे.

"उठ उपेद्रा, तेज रवीचे श्रवनीतरि फेक

सुर्यरूप त्यामुळे बनावा मानव प्रत्येक"    गीत पृ.६

'मुळशीचा पाळणा' या कवितेत धरणाने गरीबी आलेल्या मातेचे दुःख बघून कवी म्हणतात -

"मनि संकट पडते भारी

बाळा परि मी हि भिकारी

करि सवाल कुंजविहारी"

"हे धर्मात्मा पालनवाला कोई ।

करि बाळा जो जो गाई"          आ.पृ.१५

'बाळ टिळक' काव्यात टिळक स्वराज्य मिळविण्याचे अवाहन करतात ते काव्यात आले आहे. शेवटी कवी म्हणतात -

"स्वतंत्रता ही ज्याती त्याने स्वतःच मिळवावी

गुरूजन म्हणती केवळ आम्ही वाट दाखवावी"          गीत पृ.८९

'श्री सत्यविनायक' यों काव्यात विरोधाभासाने आवाहन केले आहे.

"बलहीनांच्या कानी पडतिल शब्द जरी काही
विसरूनी जारे लाभ तुम्हाला यापासुनि नाही
भारतभूमि परवशतेने झाली बेजार
आर्यमना मंदिरी मोरया झाला अवतार" आ.पृ.२१

'म्युनिसिपालटीची' आरती या काव्यात स्वार्थी नेत्यांना संबोधले आहे -

"असल्या नेत्यांचा गौरव करूनी । प्रत्येकाला द्यावी बक्षिस केरसुणी
उधळली म्यनिसिपालिटी गवताजी गंज। द्वेषबुध्दिची कोळित मेंबर करी सहज
स्वहित पराड्मुख जनता अंतरी जळत । कुंजविहारी मौज बाहेरूनि बंघत"

'तरूण भारतास' या काव्यात तरूणांना कवीने आवाहन केले आहे.

"तरूण गड्यांनो। भारतियांनो कंबर कसुनि पुढे सरा
मातृभूमिच्या उध्दारास्तव प्राणांची खैरात करा." आ.पृ.२२

'रत्नागिरी परिषद' या काव्यात दर्याला संबोधून कवी म्हणतो आहे -

"परमेशाला सांग जाऊनी मावळत्या सुर्या
आर्य जनापरि स्वतंत्र व्हाया धडपडतो दर्या" आ.पृ.२४

'सुदिन' काव्यात शिवचरित्र आले आहे हा राष्ट्र पुरूष महान योगी अवतारी पुरूष होता. त्या अवतारी पुरूषाने उज्ज्वल परंपरा आपल्यासाठी केली आहे. त्याचे स्मरण असावे.

"शिवरायांचे स्मरण । मराठ्या अंतरि धीर कांही
कृतिविन दास्य ढळत नाही.
सर्व गड्या चल मार आघाडी मानधना सुजना
किर्तीचा लाभे नजराना" आ.पृ.३२

'मराठा गडी' यशाचा धनी याही काव्यात पूर्वपरंपरेची आठवण नव तरूणाला करून

दिली आहे.

> ''शिकविली शिस्त शिवबांनी । अनुयायी आचरतात
> म्हणुनि मृत्युवर मात मिळवली लढूनी रणांगणी
> मराठा गडी यशाचा धनी'' आ.पृ.३९

'निसर्गगीता' या कवितेतही गीते प्रमाणे, कृष्णाने अर्जुनाला लढायला उद्युक्त केले तसेच इथेही निसर्ग भारतीयांना आशादायी स्वप्न दाखवून सुचकतेने अवाहन करतो आहे.

> ''शांति हवी तर युध्द करी । नातरि रौखनरक वरी
> विश्वरूपदर्शना घडले । ज्ञानांजन नयनी पडले
> शस्त्र सांवरित प्रभाकरे । विजयी हो रणधुरंधर
> निसर्गगीता गात उषा । हर्ष अधकिते दाही दिशा'' गीत पृ.८

'नव्या जगाच्या निर्मात्यांनो' यांना नव जगाची निर्मिती करण्याचे अवाहन केले आहे -

> ''स्वतंत्रता नच स्वार्थ आसुरी ते जीवनसौंदर्य नवे
> ध्येय नवे, कर्तव्य नवे, कर्तव्यपुर्ती दे रूप नवे
> बंदीवान जन बंदीवान मन बंदीवान वाळपुढी बने
> कितीक भ्याली कितीक रमली जुन्या जगाची जुनी मने
> घ्या अनुभवऋण, द्या आशाधन, उत्साहाचे तुम्ही झरे'' आ.पृ.५४

'होळी' चा आत्मसर्पणाचा गुण तरूणांनी घ्यावा त्यांना कवी म्हणतात -

> ''स्वभाव सुंदरें हवे नवे जग शिवदेवाला जिवा
> आत्म समर्पण नव दैवी गुण वरिशिल तू केधवा
> जळुनी जगणे सुवर्ण संस्कृती प्रकाशपुजन कला

सदाशिवाला प्रसन्नें करि तु मजसम माझ्या मुला"          आ.पृ.७६

'पुण्यपावन प्रेरणा' या काव्यातही भारतीयांना कवीने अवाहन केले आहे.

"एकत्र या सन्मित्र व्हा सह जीवनाची घोषना

तव पुरातन नित्य नूतन पुण्यपावन प्रेरणा"          आ.पृ.७५

अशाप्रकारे कुंजविहारींनी भारतीयांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी व स्वातंत्र्याचे सुराज्य होण्यासाठी संबोधले आहे व अवाहनही केले आहे.

**इ) कुंजविहारींची भाषाशैली**

कुंजविहारींच्या काव्यसंग्रहातील भाषिक वैशिष्ट्ये अभ्यासली या व्यतिरिक्त कुंजविहारींच्या भाषेची खास शैली म्हणजे त्यांच्या कवितेतील शब्दाला एक वेगळा ढंग आहे. तर काही कवितेतील ओळी विशिष्ट शब्द रचनेमुळे, नादमाधुर्याने आठवणीत राहतात. शब्दाला काही वेळा जुन्या वळणावर नेऊन ठेवले आहे. काही शब्द काव्यसंग्रहात वारंवार आले आहेत. कुंजविहारींच्या कल्पनेने काव्यसंग्रहात अनेक शब्द आले आहेत ते पुढील प्रमाणे पाहू,

कुंजविहारींच्या भाषाशैलीच्या वैशिष्ट्याचा खास पुरावा म्हणजे त्यांनी निर्माण केलेली शब्द संपदा. अधिकांशपणे दोन शब्दांच्या संयोगातून एक तिसराच शब्द स्वतंत्रपणे निर्माण झाला आहे. तर काही वेळेला स्वतंत्र शब्दाची निर्मितीही झाली आहे. ते शब्द पुढील प्रमाणे.

| **कविता** | | **शब्द** |
|---|---|---|
| नमोमायभूमी | - | तेजोराशी |
| संध्या | - | स्वातंत्र्याचा प्रसाद |
| तरूण भारतास | - | दिलप्यारा |
| रत्नागिरी परिषद | - | गुरूघंटा, स्वराज्य ब्रह्मास |

| | | |
|---|---|---|
| नाटक - सिनेमा महात्म | - | फराळाश्रम |
| ज्ञानेश्वरीची आरती | - | द्वैततरंग, ब्रह्मगिरीवाला |
| मराठा गडी सुमानांजली | - | वाङ्.मयवटी |
| टाक पुढे पाऊल | - | मही |
| गा रे गुणवंता | - | कटकवन |
| सिद्धसिंहासन | - | स्वर्णवल्ली |
| दावी रूप डोळा पांडुरंगा | - | डोळ्याचा देव्हारा |

कुंजविहारींच्या शैलीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अनेक शब्दाचा एक शब्द तयार केला आहे. ते शब्द पुढील प्रमाणे -

| **कविता** | | **शब्द** |
|---|---|---|
| नोकरशाहीची आरती | - | आर्ययशोध्वज |
| स्वयंवर | - | स्वतंत्रतारूक्मिणीहरण, आंगल्याथदेवता |
| मुळशीचा पाळणा | - | इष्टमित्रगणगोत्रा, धनिक बनिक |
| शहराचे सुख | - | बालमोहने |
| रत्नागिरी परिषद | - | सज्जनसंमेलनवार्ता |
| महाराष्ट्र सदगुरूस | - | महाराष्ट्रसध्दर्मध्वज |
| पुण्य पावन प्रेरणा | - | हृदयारविंदी |
| स्वागतसुमनांजली | - | सत्यसंकल्परूपिना |

कुंजविहारींच्या कालखंडाचा विचार करता काव्यसंग्रहात जुने शब्द येणे अगत्याचे आहे. तरीही या शब्दामुळे काव्याला वेगळा ढंग आला आहे ते शब्द पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| कधी रे भेटशी रामराया | - | त्वा |
| माझे ध्येय | - | तत्सेवेला |

चिमणाशूरशिपाई - प्रतिपाळी

श्री शिवरायाची आरती - साचे

महाराष्ट्र सद्‌गुरूस - मागुती

दावी रूप डोळा पांडुरंगा - कासया

बाळ टिळक - कांतार

सावित्री गीत - पारिगुणी

आणखी एक भाषिक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे एखादा विशिष्ट शब्द काव्यसंग्रहात वारंवार येतो ते शब्द पुढीलप्रमाणे :-

परवशता

ओनामा (अर्थ ॐ नमः सिद्धाये)

केवि

अशाप्रकारे कुंजविहारीच्या भाषेची खास वैशिष्ट्ये आहेत. या वैशिष्ट्यामुळे त्यांच्या भाषेला वेगळेच रूप प्राप्त झाले आहे व भाषा रोचक, भावदर्शी बनली आहे.

साधी, सोपी ,भाषा वाचकांच्या मनाचा वेध घेते व त्यांना आपलेसे करते भावनेच्या सागरात डुंबावयास लावते. उर्दू व संस्कृत शब्दाने तिला वेगळाच साज मिळतो. संबोधन व अव्हानात्मक भाषेने कविता बोलकी होते. तर कुंजविहारींच्या नव शब्द निर्मितीमुळे तिला खास ढंग प्राप्त होतो. काव्यसंग्रहात काही वेळा शब्द संस्कृत वळणावर आल्याने क्लिष्ट वाटते. पण ते शब्द भाषा सौंदर्याला कुठेही मारक ठरत नाहीत. भाषा सौंदर्य भावसौंदर्य अबाधित राहते.

**५) अलंकार सौंदर्य -**

कुंजविहारींच्या भाषेची वैशिष्ट्ये पाहत असता ती साधी, सोपी, भावानुरूप आढळते. परंतु या साधेपणालाही कुंजविहारींनी साजेल असा अलंकाराचा साज

चढविला आहे. यामुळे त्यांच्या काव्यसौंदर्यात अलंकार सौंदर्याने भरच पडली आहे. या अलंकारामध्ये प्रामुख्याने यमक, उपमा, रूपक दृष्टांत, छंद वृत्ते यांचा समावेश असल्याचे दिसते हे अलंकारसौंदर्य पुढीलप्रमाणे :-

**१) यमक -**

कुंजविहारींच्या काव्यात यमक सर्वच कवितेमध्ये साधला आहे. परंतू तो शेवटच्या अक्षरामध्ये अधिकांशपणे दिसून येतो. काव्य संग्रहातील यमकाची उदाहरणे पुढील प्रमाणे -

आम्हा देव तू धर्म तू मायभूमी । आम्हा स्फूर्ति तु किर्ती तू मायभूमी ।।
आम्ही ना कुणी सर्व तू मायभूमी । नमो मायभूमी नमो मायभूमी ।

'नमोमायभूमी' गीत पृ.२

''जेव्हा जगि धर्मध्वज होतो पदभ्रष्ट
जेव्हा मांडिति तांडव अरिदानव दुष्ट''

'श्री शिवरायाची आरती' गीत पृ.९२

''सौख्याचा डाव बुडाला । अवकळा धरेला आली
पाहुनिया संकटाला । भांबावुनि मग ती गेली''

'माझे ध्येय' आ.पृ.२

''या गळ्याला गळफास
देईल घडीभर त्रास
लाभेल मुक्ति जीवास''

'भेटेन नऊ महिन्यांनी' आ.पृ.२९

''श्री भिवरातट क्षेत्र पंढरी, पुंडलीक प्रिय भक्त जया
तो परमात्मा पांडुरंग हरि, हृदयमंदिरी भजूं तया ।''

'पांडूरंग हरी'

या व्यतिरिक्त इतर काही कवितेमध्ये यमक साधला आहे. त्या कविता 'नोकशाहीची आरती' 'सवाल' 'बार्शीच्या भगवंतास' 'सोलापूर वर्णन' 'आजकालचे हितगूज' 'टाक पुढे पाऊल' 'प्रतापगडवासिनी,' 'कहत कबीरा' अशा आहेत.

**२) उपमा -**

कुंजविहारींच्या काव्यातील उपमा अतिशय समर्पक आहेत यामुळे काव्यांचा परिणाम वाचकांच्या मनावर लगेच होता. हीच या कव्याची यशस्वीता आहे. काव्यातील उपमा पुढील प्रमाणे -

''महाराज हा जॉर्ज भूपती भीमक गुणगंभिर
आंग्ल्याय देवता शोभते अर्धांगी सुन्दर
ब्युराक्रसीचा वर्ग रूक्मया सत्तामद अंतरी
स्वार्थसखा शिशुपाल तयासह वावरतो भूवरी
एकुलती एकली कन्यका स्वतंत्रता रूक्मिणी''

'स्वयंवर' गीत पृ.२५

''शस्त्रबले तू कैलासाचे राज्य घेऊ म्हणसी
खाटिक याहुनि बरा असे हा अनुभव गाईसी''

'श्री सत्यविनायक' आ.पृ.२०



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"सहचारिणी सहधर्मचारिणी उभय कुलोद्धारिणी
सावित्रीला उपमा न जुळे सावित्री वांचुनी"

'सावित्रीगीत' आ.पृ.३७

"फुलांत जैसा सुगंध तैसा जगांत भासे मला कवी
उसांतला रस रसांत गोडी गोड गोड अति गोड चवी"

'देवदयेचे नजराणे' आ.पृ.७४

अशाप्रकारे कुंजविहारींच्या आणखीण काही कवितेमधून उपमा अलंकार येतो, सोलापूर वर्णन, रत्नागिरी परिषद, नाटक - सिनेमा महात्म्य, ज्ञानेश्वरांच्या आरती, मराठा गडी यशाचा धनी, अर्जी शारदास्तवन, स्वागतसुमनांजली, नव्या जगाचा निर्मात्यांनो स्वराज्य सुख,

**३) दृष्टांत -**

एखादे उदाहरण पटवून देण्यासाठी कुंजविहारींनी दृष्टांताचाही वापर काव्यात केला आहे. हे दृष्टांताचाही वापर काव्यात केला आहे. हे दृष्टांत समर्पक झाले आहेत.

"तो छत्रपती
श्री रामदास गुरूमाय
अवतरूनी वदले काय
की सेवक मी राष्ट्राचा"

'माझे ध्येय' आ.पृ.२

"काळाची विपरत करणी
सर्कशीत सिंहा धरूनी
बकरीसह पाजिति पाणी"

'मुळशीचा पाळणा' आ.पृ.१३

''तो ध्रुव, तो प्रल्हाद एकला अभिमन्यू एकला
झुंज झुंजूनी शिरी मिरवती अमर किर्तीचा टिळा''

'टोंक पुढे पाऊल' आ.पृ.५३

''नाभीचा कस्तुरी तिथे परिमळ । परि राजोमाळमृग पिरे
सुगंधाचा ठाव तया नाही ठावा । तेवि या मानवा पडे भूल
देव नसे दूर वसे अंतरंगी । तिथे लागवेगी घेई धाव''

'कबीराचे वचने' आ.पृ.९६

''आत्मस्मृतीविण नरजन्माचे सार्थक घडते न हे घडे
दिसीत कितिही सुंदर वाटा रूतावयाचे रत्नखडे''

'महावीर' आ.पृ.१०१

''कळतसे श्वानालाही धनी त्याचा कोठे वसे
समजती मला तुझ्या पाऊलांचे नित्य असे''

'भावसुमनाजंली' आ.पृ.१११

**४) रूपक -**

महाकवी नेहमी रूपकाच्या भाषेतूनच बोलत असतो उघडपणे आहे त्या परिस्थितीवर मत नोंदवणे धोक्याचे होते, म्हणून कुंजविहारींनी आपले काव्य पौराणिक कथेचा आधार घेऊन निसर्गाचा आधार घेऊन अनेक कल्पनांचा आधार घेऊन काव्य लिहले आहे. म्हणजेच रूपकाचे स्थान दिसते. या अलंकार सौंदर्याने कुंजविहारींच्या काव्यात गूढरम्यता दिसून येते. रूपकाची उदाहरणे पुढीलप्रमाणे,

“तेजोराशि सहोदरा दिनकरा । सांभाळ भूदेविला
हांसे पूर्वदिशा सुहास्य । गगनी शोभे प्रकाशापरी
ऐसे हास्य विभो कधी बघिन मी या हिंदूभूमीशी”

‘नमोमायभूमी’ आ.पृ.४

“आर्यभूमिच्या भाग्यरवीचे सुवर्ण किरणे तुम्ही जणू
भारत भाग्योदय कालीन नव कोकिळ कुजन गमे आम्हा”

‘नव्या जगाच्या निर्मात्यांनो’ आ.पृ.५४

“कर्तृत्वाचे रोप कोंबले नांगरटीला बळी
फासांवरली फुले सुगंधित मरताना हासली.”

‘बंडखोर स्फूर्ती’ आ.पृ.८०

“दीन दुर्बळा पिळुनि काढतां जन्म तिथे गेला
मुक्या जिवाचे मूक मनोरथ कसे कळावे त्याला
किति जन्माचा कुणास ठावा साधून घेती दावा
नको उगवणे नको वाढणे नच हुरडा होणे”

‘हुरडा’ गीत पृ.३०

“शांति हवी तर युध्द करी । नातरि रौरव नरक वरी
विश्वरूपदर्शन घडले । ज्ञानांजन नयनी पडले
शस्त्र सावरित प्रभाकर । विजयी हो रणधुरंधर
निसर्गगीता गात उषा । हर्ष उधळिते दाही दिशा”

‘निसर्गगीता’ आ.पृ.४४, ४५

"तव शुभ उदरी जन्म पुन्हा घेवोनी
भेटेन नऊ महिन्यांनी"

'भेटेन नऊ महिन्यांनी' आ.पृ.२९

अशाप्रकारे या कविता व आणखी ही काही कविता आहेत. सोलापूरवर्णन, सिद्धसिंहासन, देवदयेचे नजराणे, स्वयंवर तुळशीवृंदावन, होळी, उद्याचा देव असावा कसा, कवि कल्पना, या कवितेतून रूपक अलंकार उत्तम प्रकारे साधला आहे.

या अलंकाराप्रमाणे इतरही काही कविता आहेत की ज्यामध्ये वृत्तांचाही समावेश होता. छंदामध्ये कविता लिहल्या आहेत अभंग या छंदामध्ये दावी रूप डोळा, कधी रे भेटसी रामराया, बार्शीच्या भगवंतास, पंढरीच्या पांडुरंगास, पांडुरंग हरी या कविता लिहिल्या आहेत तर ओवी या छंदामध्ये महात्मा गांधी गीत लिहिल्या आहे. लावणी या छंदात गडे मज संगे घेऊन चला. ही कविता लिहली आहे. मुक्त छंदामध्ये ओवाळणी हे काव्य लिहले आहे. तर भुजंगप्रयात या वृत्तात नमोमायभूमी ही कविता लिहली आहे.

अशा प्रकारे उपमा, यमक, दृष्टांत, रूपक, विविध छंदातून व वृत्तातून कुंजविहारींची कविता जनमानसापर्यंत पोहचली आहे. हीच या काव्यसौंदर्याची अलंकाराची यशस्वीता आहे.

**६) चित्रमय शैली -**

कुंजविहारींनी काव्यसंग्रहामध्ये काही प्रसंगाचे, सद्यस्थितीचे निसर्गाचे चित्रण केले आहे. ते प्रसंग चित्रित करत असताना जसेच्या तसे वाचकांच्या समोर उभे राहिले आहेत. याचे कारण म्हणजे कुंजविहारींची चित्रमय शैली या शैलीमुळे तो प्रसंग एका क्षणात वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. या चित्रमय शैलीमुळे त्यांचे काव्य सजीव झाले आहे. या शैलीची काही उदाहरण पुढीलप्रमाणे पाहुया.

भेटेन नऊ महिन्यांनी फाशीच्या शिक्षेचा प्रसंग कसा बोलका आहे.

“लाडका बाळ एकूलता
फाशीची शिक्षा होता
कवटाळूनि त्यॉला माता
अतिआक्रोशे रडते केविलवाण्या
भेटेन नऊ महिन्यांनी ।।
किती वेळ असा शोक करिसि गे असला
दे निरोप मज जायला
होईल पहा विफल तुझा आकांत
बाहेर उभे यमदुत”   आ.पृ.२८

ओवाळणी या काव्यातही साधाप्रसंगपण हृयगम्य झाला आहे.

तया ओवाळूनि जनन दे बोल
अता ओवाळणी काय घालशील ?
बाळ भांबावुनि बघत भोवताली
दूर जिवलग जाहले अशा वेळी
विचारांच काहूर विरूनि गेले
हळुच बाळाने गाल पुढे केले
धरी हृदयी माऊली राजसाला.

अशाप्रकारे कुंजविहारींची चित्रमय शैली बोलकी आहे. तिच्यात साधेपणा आहे पण वाचकांच्या मनाचा वेध घेणारी आहे. ‘रूक्मिणी स्वयंवर’ ‘येऊ दे करूणा’ ‘शहराचे सुख’ आदी कवितांमध्ये ही चित्रमयशैली दिसते.

### ७) प्रतीके -

कुंजविहारींच्या काव्याचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या काव्यात येणारी प्रतिके काव्यातील कल्पना प्रतिकांच्या रूपाने प्रकट झाल्या आहेत. ही प्रतीके रोजच्या व्यवहारातील असल्याने वाचकांना काव्याचा अर्थ पटकन समजतो. काव्यसंग्रहात येणारी प्रतीके पुढील प्रमाणे -

''काय पहा शूरत्वे नराचे, किती निधडी छाती
रानगावच्या राजावरती शस्त्राते चालविती
काळ्या शेतांतिल कणसांची मान मोडताना
दयाधर्म कधि आठवतो कां बेशरमी शूरांना''

'हुरडा' गीत पृ.३०

''बुध्दी - राधिका - प्रियकर मन - मुरलीवाला
सारे विश्व विशेषण साजतसे ज्याला
तो योगेश्वर श्रीहरी ब्रह्मगिरीवाला
गीता - गानी रंगुनि अतारि अवतरला.''

'ज्ञानेश्वराची आरती' गीत पृ.१९

''सत्याचा अभिमान वागवि सदा पाषाणही एकला''

'वंदेमातरम्' आ.पृ.३४

''शिणलेल्या सिंहावरि चालुनि उदयभानु ये रणा
जगातिल प्रहरांचा-पाहुणा''

'मराठा गडी यशाचा धनी' आ.पृ.४०

“इतिहासाची अनुक्रणिका सुत्रबध्द सानुली
शास्वत जीवन कथारसाची ती तर गंगाजळी”

‘प्रतापगडवासिनी’ आ.पृ.७८

या कवितेप्रमाणे ‘राजधानी’ ‘होळी’ या कवितेमध्ये प्रतिके आली आहेत. प्रत्येक प्रतिकाच्या पाठीमागे खूप मोठा अर्थ दडलेला आहे. या प्रतिकांना परंपरेचा इतिहासाचा अधार आहे. त्यामुळे वाचकांना प्रतिकांचा अर्थ पटकन समजतो व कविता परिणामकारक बनते.

**८) प्रतिमा -**

कुंजविहारींच्या काव्यसंग्रहात प्रतिमा आल्या आहेत. या प्रतिमा कवितेमधील अर्थाच्या परिणामाची खोली वाढवतात व तो प्रसंग, कल्पना उठावदार बनवतात. या प्रतिमांचा ठसा पूर्ण कवितेमध्ये उमटलेला दिसतो. या प्रतिमा काव्यातील विचारांना एक निश्चित दिशा देतात. काव्यातील काही प्रतिमा पुढील प्रमाणे.

“मुक्या जीवांचा शाप मला भवला ‘सावळा’ माझा अंतरला
पाहुनी त्याला होतो सुखरूप वाढत्या वंशाचे रोपा”

‘येऊ दे करूणा’ गीत पृ.३२

“असोनी हरी भावितो श्वान मी की
असोनी धनी तस्करता नमी की
असोनी हिरा त्यास हिनत्व आले
म्हणावे तुम्हा कवि मागसलेले”

‘मागसलेल्यास’ गीत पृ.३६

“समरांगणि सहवास सुखाचा चंचल समशेरिचा

न सहवे बडेजाव सवतिचा"

'गडे मज संगे घेऊनि चला' गीत पृ.४५

"खांबाला फुटतील फाटे

मृदु सुमसम होतिल कांटे

हिमगिरीषला सागर भेटे"

'भेटेन नऊ महिन्यांनी' आ.पृ.३०

"विवेकवादी विश्वमित्र तू सुशील सत्याग्रही

तुझी एकली चाल 'मोहना' वंदील सारी मही"

'टाक पुढे पाऊल' आ.पृ.५३

अशाप्रकारे आहुती, गीतगुंजारव काव्य संग्रहातील प्रतिमा आहेत. या प्रतिमांचा ठसा जनमानसापर्यंत पडतो. या प्रतिमांना एक प्रकारे सुभाषिताचा दर्जा प्राप्त होतो हे निश्चित.

**९) आशय बदलला की अभिव्यक्ती बदलते -**

कुंजविहारींच्या कवितांचा कालखंड हा विस्तृत आहे. इ.स.१८१८ ते १९६९ हा कालखंड आहे या कालखंडाचे दोन विभाग करता येतील स्वातंत्र्यपूर्वकालीन कविता व स्वातंत्र्योत्तर कालीन कविता स्वातंत्र्यपूर्व कालीन काळखंडात कुंजविहारीच्यापुढे स्वातंत्र्य मिळविण्याचे आवाहन होते. कवीनी पूर्णपणे राष्ट्रसेवेला वाहून घेतले होते तोच एक उद्देश त्यांच्या मनात कवितेत, कृतीत होता. म्हणून त्यांच्या कवितेतील अभिव्यक्ती ही स्वातंत्र्य मिळविण्यासाठी होती. तीच कवितेची प्रेरणा होती. स्वातंत्र्योत्तर कालीन कवितेमध्ये राष्ट्रभावना आहे. परंतु स्वातंत्र्य मिळाल्याने आनंद व्यक्त केला व सुराज्य होण्यासाठी सद्यस्थिती चित्रित करण्यासाठी कुंजविहारींनी आपली अभिव्यक्ती

खर्च केली.

आशय, काळ बदलला की अभिव्यक्ती बदलते याचे एक उदाहरण भेटेन नऊ महिन्यांनी या कवितेमध्ये स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढण्याची तीव्र इच्छा व्यक्त कशी होते पहा -

मागेन हेच श्रीहरीला
मातृभूमि उध्दरण्याला
स्वातंत्र्यरणी लढण्याला

तरी हीच स्वातंत्र्याची भावना बंडखोर स्फूर्ति या कवितेत कशी आहे पहा -

स्वातंत्र्याचे दीर्घ सूत्र ते रक्ताने रंगले
स्वातंत्र्यास्तव लढू करू कृतकर्माचे क्षालन
स्वातंत्र्यास्तव जगणे मरणे दैवी गुण संपदा

इथे लढण्याची धारजरा कमी झाली आहे.

राष्ट्रभक्तीच्या अभिव्यक्ती मध्येही बदल झाला आहे. माझे ध्येय मध्ये कवी म्हणतात.

हा स्वार्थे धूप जाळून
ओवाळूनि पंचप्राण
की सेवक मी राष्ट्राचा

पुढे नव तरूणास म्हणतात -

गत शतकाच्या इतिहासाच्या ऐकुनि आक्रंदना
शिवसंकल्पे राष्ट्रकारणी प्राण लाविता पणा
स्वजनहितास्तव सध्दर्मास्तव सत्कर्मास्तव जिणे
दीन दूर्बळासाठी जिवित वित्तही ते वेचणे.

प्रथम राष्ट्रकार्यासाठी स्वातंत्र्यासाठी कवी सेवक बनले आहेत स्वातंत्र्य मिळाल्यानंतर

दुर्बळासांठी काही करण्याची मनिषा आहे.

अशाप्रकारे आशावादी भूमिकेमध्येही स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळण्यासाठीची दुर्दम्य इच्छाशक्ती व्यक झाली नतर सुराज्य होण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

अशाप्रकारे कुंजविहारींच्या काव्यात आशय बदला तेव्हा त्यांच्या अभिव्यक्तिमध्ये ही बदल झाल्याचे दिसून येते.

**समारोप -**

चौथ्या प्रकरणामध्ये कुंजविहारींच्या काव्याचा भाषासौंदर्याच्या दृष्टीने अभ्यास केला. या दृष्टिकोणातून् कुंजविहारींच्या काव्याकडे पाहिले असता काही ठळक वैशिष्ट्ये आपणांस दिसतात ती पुढील प्रमाणे :

कुंजविहारींनी अनेक काव्यप्रकार हाताळले त्यातून त्यांची बहुश्रूतता दिसून येते व काव्यलेखना मागचा हातखंडा दिसतो. व जनतेच्या मनाची नाडी ओळखूनच व त्यांना पचेल अशा काव्यप्रकारात व भाषेत लिहले आहे. काव्यातील रसांचा विचार करता राष्ट्रभक्ती स्वातंत्र्यप्रेम आदी भावना व्यक्त करण्यासाठी त्यास अनुरूप अशा रसांची निर्मिती केली आहे. वीर, करूण, वत्सल, भक्ती रसांची निर्मिती केली आहे. अध्यात्म्रमध्ये शांतरसही आला आहे. या रसांनी कुंजविहारींचे काव्य रसपूर्ण झाले आहे. गेय व काव्यातील नादमाधुर्याने त्यांचे काव्य लोकांच्या ओठापर्यंत नव्हेतर हृदयापर्यंत जावून पोहचले आहे.

कुंजविहारींनी विविध शब्दकळांचा वापर केला आहे. साधी सोपी भावनुरूप भाषा असल्याने सामान्यांना ती रूचली व पचली आहे. संस्कृत व उर्दू भाषेने त्यांची बहुभाषिकता दिसून येते. संबोधन व आवाहनात्मक भाषा राष्ट्रीय कवितेला एक भरीवपणा देते. लोकांना कार्यप्रवण बनविण्यास मदत करते. अलंकारसौंदर्य सुध्दा

भाषेला साजेल असेच आहे. तिथे हिऱ्यांचा माणकांचा लखलखाट नाही तर मोत्यांचे मंदसौंदर्य प्राप्त   झाले आहे. काव्यात चित्रमय शैली येते त्यामुळे काव्यात प्रसंग सजीव होतात. यातून कवीची निरीक्षण शक्ती व नेमकेपणा दिसून येतो. प्रतीक ही काव्यातील प्रतीकेचे झाली आहेत. तसेच प्रतिमा या कवीच्या व काव्यांच्या विचाराचे प्रतिबिंब झाल्या आहेत. तसेच या सर्व काव्यातून आणखी एक मुद्दा लक्षात येतो तो म्हणजे. कुंजविहारींच्या काव्याचा आशय बदलला की अभिव्यतीही बदलले दिसते आणि हेच राष्ट्रीय कवितेचे खास वैशिष्ट्ये बनते. कारण प्रतिकुल काळात राष्ट्रभावना तीव्र असते. तर अनुकूल काळात तिची धार बोथट होते. अशाप्रकारे आपण चौथ्या प्रकरणातील भाषासौंदर्याचा कवितेतील सौंदर्याचा आढावा घेतला.

**संदर्भ सूची -**


१) कुंजविहारी **'गीतगुंजारव'** कुंजविहारी, गीतगुंजारव मंडळ, सोलापूर, प्रस्तावना पृष्ट - २२

२) संपादक श्री.ज.शा.देशपांडे **आहुती,** डॉ.उषा इथापे (एम.ए.पी.एच.डी.) कुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पस्तावना पृष्ठ - १६

३) कुंजविहारी 'गीतगुंजारव' कुंजविहारी, गीतगुंजारव मंडळ सोलापूर प्रस्तावना पृष्ठ २२